
# माणूस


६ जानेवारी १९७३

५० पैसे



तहान-भुकेने भोवळलेला बार्शी तालुका

—पन्नालाल सुराणा



संपादक
श्री. ग. माजगावकर

६ जानेवारी १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये वर्ष : बारा अंक : एकतीस
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

## सप्रेम नमस्कार...

२५ डिसेंबर, ७२

□ २३ डिसेंबरच्या अंकातील 'नवी गुलामगिरी' हे पत्र वाचले. खेडोपाडी चाललेल्या ह्या भयानक गुंडगिरीला वाचा फोडल्याबद्दल लेखकाचे नि आपले मनःपूर्वक अभिनंदन. आपण गुंडगिरी अशीच धैर्यपूर्वक प्रकाशात आणत राहावी ही विनंती. एक दिवस यश येईलच येईल की काहीतरी चांगले घडलेले आपल्याला वाचायला मिळेल असा दृढ विश्वास वाटतो.

विकली जाणारी भारतीय माणसे ह्या लेखाबद्दल काय लिहू ? धन्यवाद. हा लेख लिहिणे ही काळाची गरज आहे. या लेखातील कित्येक वाक्ये पुन्हा पुन्हा मनन करावीत अशी आहेत.

सु. ह. जोशी, पुणे

२६ डिसेंबर ७२

□ हे पत्र मुद्दाम लिहिण्याचं कारण म्हणजे 'माणूस'च्या १६ डिसेंबर १९७२ च्या अंकातील भास्कर उत्तरवार यांची कथा आवडली. सहसा कथा न वाचणारा पण साराच्या चित्तवेधक चित्रणामुळे ती संपूर्ण वाचली, पुन: वाचली; थोडासा चटका लावून गेली.

सुधाकर कुलकर्णी, जयसिंगपूर.

## पुन्हा एकदा स्वातंत्र्य

माणूस २३ डिसेंबर १९७२ च्या अंकातील पुष्पाबाई भाव्यांनी लिहिलेला लेख वाचला. नरेंद्र सिंदकरांच्या बरोबर झालेल्या चर्चेचे निमित्ताने त्यांनी आपली मते सडेतोडपणे मांडली आहेत. पुष्पा-

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

बाईंनी घेतलेले सगळे आक्षेप योग्य वाटले. पटले. अन्न, वस्त्र, निवारा म्हणजे सुख ही त्यांना पशुकल्पना वाटते. हेही बरोबर. भारतातील लोकशाही स्वातंत्र्याचे त्यांना कौतुक वाटते पण त्या हे विसरतात की हे लोकशाही स्वातंत्र्य सध्या भारतात किती लोकांच्या वाट्याला येते ? जास्तीत जास्त ३०% लोकांच्या. आणि आपण लिहिणारे, वाचणारे, बोलणारे, प्रश्नांना वाचा फोडणारे, हक्काच्या स्वातंत्र्याच्या गप्पा करणारे त्या ३०% लोकांच्या 'खास अधिकार (Previledged class) असलेल्या वर्गात मोडतो. उरलेल्या ७०% लोकांना खरोखरच स्वातंत्र्य मिळते का ? ह्या लोकांना मानसिक स्वातंत्र्य जाऊ दे पण मूलभूत गरजांचे तरी स्वातंत्र्य मिळते का ? अन्न खाण्याचे स्वातंत्र्य आधीच इतके भयंकर मर्यादित असते. हातावर जगणारे, रोजची मजूरी कमावून खाणारे हे लोक. त्यांना काम हवे असते. पण सरकार त्यांना काम-सुद्धा देऊ शकत नाही. काम करण्याचे स्वातंत्र्यसुद्धा त्यांना नाही. निसत्व अन्न खाऊन कसेबसे कुत्र्यासारखे जिणे ते जगतात. रोज ढोरासारखे कष्ट करून सुद्धा एखादी सुकी भाकरी, जहाल तिखट आणि पाण्याचे घोट एवढेच त्यांच्या नशिबी असतं. वस्त्र तर त्यांना दागिन्यांच्याच मोलाचे. नवीन धडुत कधी काळी दृष्टिस पडतं. एरवी चिंध्याचेच ते वाटेकरी आणि निवारा तर आपण बघतोच. दलदलीत डांसांच्या आसऱ्याने उगवलेल्या असंख्य झोपड-पट्ट्या. सकाळच्या प्रातर्विधीसाठी आणि लैंगिक भुकेसाठी सुद्धा ज्यांच्या आयु-ष्याला खाजगीपणाचा स्पर्श नाही. अशी वाऱ्यावर पडलेली ही असंख्य माणसे, यांना तर जगण्याचेच स्वातंत्र्य नाही. दुष्काळासारखी आपत्ती झाली की सरकारलासुद्धा हे लोक (expendable) मातीमोलाचे वाटतात. सुरक्षित शहरावर त्यांचे आक्रमण होऊ नये म्हणून किती आटोकाट प्रयत्न होत असतात अशा स्थितीत मानसिक स्वातंत्र्य सर्वांनाच उपभोगता यावे यासाठी तरी सर्व समाजाच्या मूलभूत गरजा भागविल्या गेल्या पाहिजेत की नाहीत ?

आणि पुष्पाबाई एक गोष्ट विसरता तुम्ही. तुम्ही आम्ही स्वातंत्र्य उपभोगीत आहोत ते याच लोकांच्या जीवावर. अगदी सरळपणे नाही पण आडवळणाने (indirectly) या लोकांचे शोषण करून, या लोकांच्या योग्य श्रमांचा त्यांना मोबदला न देऊन तुम्ही आम्ही आज सुस्थितीत आहोत. आणि मग जरा रिकामपणी खुर्चीत बसून आम्ही वाङमय वाचतो. सेन्सॉरशिपबद्दल चर्चा करतो. माझ्या घरात काम करायला बाई असते. ती रोज १० तास काम करूनसुद्धा तिला महिना १०० रु. मिळत नाहीत. आणि मी रोज आठ तास काम करून आठवड्यातून एक दिवस सुट्टी घेऊन मला ७००-८०० रु. मिळत असतात. हे असे का ? एवढा फरक का ? एवढी विषमता का ? प्रत्येक कामाची, सेवेची ही मूल्यपद्धती कोणी ठरविली ? ह्या मूल्यपद्धतीचे मूळ

कोणत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेत आहे ह्याचा कधी विचार केलाय? मतभिन्नता व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य हे भारतीय लोकशाहीचे यश जरूर आहे. पण या स्वातंत्र्याचा उपभोग घेऊन देखील जर ९०% लोकांच्या जीवनावर काही परिणाम होणार नसेल तर हेच स्वातंत्र्य वांझोटे आहे याची जाणीव आम्हाला अस्वस्थ करते का? विरोधी पक्षानी आरडा ओरडा करूनही भूमिहीनाना जमीन मिळते का? हरित-क्रांती ही वरवरची आहे त्यामुळे विषमता वाढते आहे हे तज्ज्ञांनी दाखवून दिल्यावरही सरकारी धोरणात काही फरक पडतो आहे का? हे स्वातंत्र्य फक्त ओरडण्याचे आहे. तेही क्षीण आवाजात. कारण आम जनतेचा आवाज त्यात मिसळू शकत नाही आणि आहे त्या प्रकारच्या लोकशाही चौकटीत ही पशु-तुल्य, मूढ जनता जागृत होऊन खरे स्वातंत्र्य मिळवू शकण्याची सुतराम शक्यता नाही

इंपोर्टेड गोष्टींना या समाजात मान का? मुलगा परदेशात स्थायिक होण्यात धन्यता का वाटते? ही सामाजिक मूल्ये या समाजात कोणामुळे प्रस्थापित होतात? ज्या हातात आर्थिक, सामाजिक राजकीय सत्ता असते तो वर्ग जसा चालतो, बोलतो, ज्या गोष्टींना महत्त्व देऊन आपले हितसंबंध शाबूत राखू इच्छितो त्या वर्गाचे अनुकरण होणे स्वाभाविक आहे. भारतीय माणसे परदेशात विकली जातात असे पुष्पाताई म्हणतात. मी तर म्हणेन सुशिक्षित, बुद्धिवंत भारतीय या व्यवस्थेनेच विकत घेतलेले असतात. येथील धनिक वर्ग जरा जास्ती पैसे फेकून या लोकांना आंधळे बनवतो. भोवतालच्या परिस्थितींबद्दल विचार करायला असमर्थ करून ठेवतो. सध्या रुढ असलेली सामाजिक मूल्ये जर जायची असतील, खरा स्वदेशाभिमान लोकांच्या मनात रुजवायचा असेल तर आहे हीच सामाजिक पद्धत कायम ठेवून फक्त या खोटया कल्पना, परधार्जिणेपणा जाईल अशी अपेक्षा ठेवली तर ते चूक ठरेल. त्यासाठी ही व्यवस्थाच बदलायला हवी ही जाणीव किती लोकांना असते? तर पुष्पाबाई, तुम्ही आम्ही नुसते आक्षेप घेऊनच थांबू नये तर त्या आक्षेपांच्या मुळाशी जाऊन त्यांचा शोध घ्यावा ही विनंती.

२८ डिसेंबर, ७२ — छाया दातार, मुंबई

तहान-भुकेने भोवळलेला

# बार्शी तालुका

पन्नालाल सुराणा

कुर्डूवाडीला गाडी उशीरा आली. आधीची बस चुकली. नंतरची उशीरा आली. बार्शीला पोहोचल्यावर सगळे उरकले जनवाणीला मजकूर पाठवायचा होता. पत्रेही बरीच साचली होती. टेबलाशी बसून कामाला सुरुवात केली. एवढ्यात नामदेव वठारे आले. म्हणाले की तळ्यावरची माणसे चिडली आहेत. मोर्चा काढायचा म्हणतात. कारण — मजुरी फार कमी पडली. पुरुषाला दीड आणि बाईला सव्वा. पगारहि उशिरा झाला. वठारेंना पुढे पाठवले. सायकल टांग मारून मीही गेलो.

शहराच्या उत्तरेकडील हे तळे फार जुने. ते आटल्याचे कुणालाच आठवत नव्हते. यावर्षी मात्र तसे घडले. गाळ काढायचे काम बऱ्याच मागणीनंतर गेल्या ऑक्टोबरात सुरू झाले. सध्या २८०० मजूर काम करतात. तळ्यावर पोहोचल्यावर भोवती गराडा पडला. सगळ्यांच्याच तक्रारी. पण भरावाच्या बाजूच्या माणसांनी काम चालू ठेवले होते. त्यांना मजुरी अडीच-दोन पडत होती. लोकांना काम चालू ठेवायला सांगून मी ओव्हरसीयरना गाठले. कांबळेसाहेब म्हणाले की काही जणांना मजुरी कमी पडते हे खरे. पण त्यांचे कामच कमी भरते.

'वाहतूक फार लांब पडती. अंगात ताकत न्हाई. तरी पाटी डबल भरून माती वाहतोत. पर लई लांब पडतय' ... एक बाई म्हणाली. गड्यांचेही तेच म्हणणे.

कांबळेंनाही ते मान्य होते. ते म्हणाले की ट्रक व गाड्या यापूर्वी तळ्यात येऊ देत होतो. पण चार दिवसापूर्वी ॲक्सिडेंट झाला. एक पोरगा गेला. त्यामुळे माती लांबवर न्यावी लागते. काही जणांना तर अडीचशे-तीनशे मीटरपर्यंत वाहतूक पडते.

कांबळेंची मस्टर्स चाळली. एका गँगच्या हिशोबात दरच साठ पैशांनी

कमी धरला गेला होता. दुसरी बावीची गँग – काम फार कमी झाले.

'बावी इथून सात मैल. तेथून पायी चालत येऊन माणसे काम करणार. काम कमी होणारच की.'

'त्याचं असं आहे – सरकारी नियमानुसार शहरातील लोकांना दुष्काळी कामावर काम देता येत नाही. म्हणून आम्ही शेजारच्या खेडयांची नावे गँगला दिली आहेत. माणसे इथलीच.'

'न्हाई सायब, त्यांचं तसं असल म्हणा. पर आमी दडशिंगचं हाव. रोज पाच मैल चालत याव लागत....'

'इतकी मेहनत करून दिवसभर काम केल्यावर त्यांना सव्वा रुपया पड-णार. बाजारात ज्वारीचा भाव एक रुपया साठ पैसे किलो. दिवसभरात किलोभर ज्वारी कमावता आली नाही तर माणसांनी जगायचे कसे?'

'खरंच साहेब तुम्ही म्हणता ते,' कांबळे बोलू लागले. 'पण मी तरी काय करणार? हिशोबाप्रमाणेच पैसे देणार.'

'वाहतूक भत्ता वाढवा, नाहीतर ट्रक-गाडया तलावात येऊ द्या. पण लोकांना मजुरी भरपूर पडली पाहिजे.'

'रावसाहेबांशी बोलतो. काही तरी मार्ग काढतो.'

'आणि, शेड दिसत नाही.'

'अद्याप बांधली नाही.'

'औषधपाण्याची काय सोय?'

'डॉक्टर कधी कधी येतात. पण औषधांची तरतूद नाही असे वरचे साहेब म्हणाले.'

'का? हे दुष्काळी कामच आहे ना? तुम्ही कामाचा दर त्यामुळेच दहा टक्क्यांनी कमी धरला ना? मग निवारा, औषधे – या सोयी का नाहीत?'

'साहेब वेळच मिळत नाही बघा. तुम्ही मजुरांच्या अडचणी पाहिल्यात, पण माझ्या? आमचे ऑफिस सोला-पूरला. मला येथे बसायला जागा नाही. टेबल खुर्ची नाही. कसे काम करायचे?'

दुपारी रोहिदास व वीणाने त्या तक्रारी तहसीलदारसाहेबांकडे पोहोच-वल्या. त्यांनी लक्ष घालण्याचे कबूल केले. 'पण टेबल खुर्चीचे कसे जमणार? माझ्या ऑफिसमध्ये तरी कोठे पुरेशी आहेत?'

लिखाण अर्धवट झाले. तेवढयात महाराज व नानासाहेब आले. मग नगरपालिकेत गेलो. आडसोळीचे नकाशे पाहिले. १९४८ पासून भिजत पडलेली योजना. १९६० साली ६१ लाखाची होती. आता चार कोटीची झाली. बार्शीला पाण्याची तीव्र टंचाई, नळाला दिवसातून पाऊण तास पाणी येते. निम्म्या गावाला तर तेहि नाही. लांबच्या विहिरीचे पाणी टँकर व बैल-गाडीने आणून पुरविले जाते. गेल्या महिन्याभरात त्याचेही प्रमाण कमी झाले आहे. गावात पाच बोअरिंगपंप झाले. पण तेवढयानेही भागत नाही. शिवाय कायमची योजना व्हायलाच हवी. म्हणून शहरवासीयांनी एकमुखी मागणी केली. अखेरीस चौदा डिसेंबरला बार्शी बंद झाले. आमदार शितोळेबाईंनी तगादा लावल्यामुळे पंधरा डिसेंबरला

ही योजना मंजूर केल्याची घोषणा नगरविकासमंत्र्यांनी केली होती. पण नगरपालिकेकडे अद्याप सूचना आली नव्हती. नकाशे पाहिले. काही माहिती घेतली....परत येऊन घाईने टपाल संपवले. मेलवर पाठवले. रोहिदासने दम दिला, 'चोवीस-पंचवीसच्या दौऱ्याचे निरोप सगळीकडे पाठविले बर का. नाही तर आयत्यावेळी तुमचे निघेल मुंबई पुण्याचे...'

रात्री आडसोळी कृतिसमितीची बैठक. मला बस पकडायची असल्याने लवकर आटोपावी लागली. स्टँडवर आलो. लातूर-मुंबई बस आली होती, पण चाक पंक्चर असल्याने डेपोत गेली होती. तासाभराने बाहेर आली. गर्दी भरपूर. शेवटी ड्रायव्हरच्या केबिनमध्ये बसलो. टेंभुर्णीच्या पुढे परत पंक्चर. अर्धा तास गेला. इंदापूरला आल्यावर ड्रायव्हरने गाडी डेपोत घेतली. स्टेपनी दुरुस्त करून घ्यायची होती. डेपो लहान. दुसऱ्या पाळीचे मेकॅनिकही घरी गेले होते. शेवटी दोघांना बोलावून आणले. मी अर्धवट झोपेत सगळे ऐकत होतो. अखेरीस जमले. उजाडल्यावर पुणे गाठले. बस अवघी पावणेतीन तास लेट आली होती...

विनायकरावांच्या खोलीवर गेलो. पक्षांतर्गत घडामोडींविषयी बोललो. राष्ट्रीय पातळीवर सगळा तमाशाच चाललेला. एकमेकांशी बोलून मन हलके करायचे एवढेच. मोठ्याने बोलायचीही चोरी...पक्षाची अब्रू जपली पाहिजे ना...कचेरीवर जाऊन टपाल पाहिले. एक परिपत्रक तयार करून दिले. काही पत्रे, दोन-चार फोन...देशपांडेंच्याकडे गेलो. ते कॉलेजातून यायचे होते म्हणून झोपलो. राजूने हलवले तरी जाग आली नाही. शेवटी देशपांडेंनी उठवले. जेवताना देशपांडे म्हणाले, दुष्काळनिवारण कार्याचा दूरगामी परिणाम काय काय होतो असा विषय अभ्यासाला घ्यायचा विचार आहे...जेवण उरकल्यावर महाराष्ट्राच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या चर्चेला बसलो. मंत्रिमंडळाच्या उपसमितीने सप्टेंबरात तयार केलेल्या टिपणातील पहिलेच वाक्य आहे, 'गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्राचे शेती-उत्पादन फारसे वाढले नाही. अन्न-धान्याचे तर घटलेच आहे..' 'मंत्रि-मंडळाने हरित क्रांतीवाल्या वसंतराव नाईकांवर मांडलेला हा अविश्वास ठरावच दिसतो' माझे राजकीय भाष्य. देशपांडेंनी अर्थशास्त्र सुरू केले. गेल्या दहा वर्षांत शेतीविकासावर खर्च झाला; तरीही उत्पादन वाढले नाही. ही गंभीर बाब आहे. त्याच्या कारणांचा खोलात जाऊन शोध घ्यायला पाहिजे... देशपांड्यांनी फार बारकाईने विचार केलेला दिसला. त्यांना लेख लिहायला सांगितले...

अडीचला कचेरीवर आलो. काही पत्रे. काही फोन...गोखले अर्थशास्त्र संस्थेत साडेतीनला मध्यवर्ती दुष्काळ-निवारण समितीच्या कार्यकारिणीची बैठक होती. त्यासाठीच तर एवढी धावपळ करून आलो होतो. आज उप-स्थिती एकदम वाढली होती. चर्चा सुरू

झाली. घटना वनविण्यावर चर्चा करायची की नाही यावर अर्धा तास चर्चा आणि त्यानंतर घटनेतील मुख्य बाबींवर दीड तास वादविवाद. निरीक्षक नेमणुकीबाबतही तसेच. दुष्काळाच्या मुख्य प्रश्नांची चर्चाच नाही. आपला भांडकुदळपणा कधी संपणार कोण जाणे...बैठक संपवून कचेरीवर आलो. राजहंसांचा फोन. कृतिसमितीची बैठक २९ ला मुंबईला. बैठका–बैठका–आवरा-आवर करून शिवाजीनगर स्टँडला आलो. कुसुंबेकरांनी दिलेले कागद घंटींना दिले. ते म्हणाले, 'महामंडळाशी करार लवकर व्हावा, कामगार अस्वस्थ झाले आहेत...' 'लातूर बस आली का ?'

'नाही. अहो, सकाळी चार तास उशिरा गेली.'

म्हणजे परत तीच बस. साडेनवाला आली. तिने उशीर केल्याने काही इष्ट-मित्रांच्या भेटी मात्र झाल्या. बस ताव्यात घेतल्यावर घोडकेंनी परत आत नेली. पण मेकॅनिकांना वेळ नव्हता. शिंदे कंडक्टर म्हणाले, भाऊ तुम्ही नांदेड बसने जा. हिचा काही भरंवसा नाही. पण त्या बसमध्ये घाण झाली होती आणि मागे नांदेड बसनेही चार-पाच तासांचा उशीर केला होताच. अखेरीस बस निघाली. घोडकेंच्या कौशल्यामुळे सुखरूप बार्शीला आलो. रात्री एकला यायची ती तीनला, एवढेच. घरी येऊन थोडे खाल्ले आणि झोपलो...

सकाळी उठून लेख लिहायला घेतला. चहा होईस्तवर कांबळे येऊन मी आल्याची खात्री करून गेले. हमाल पंचायताला सरकारी गोडाऊनच्या हमालीकामाचे कंत्राट मिळाले आहे.. त्यासंबंधी बोलायला महादेव शिंदे आले.. अनिल पाटील आणि सहस्रबुद्धेंना आडसोळीबाबत बोलायला बोलावले होते...रिलायबिलीटी कमी वाटते, दुष्काळात काय होईल अशी तज्ज्ञांना शंका आलेली दिसते. 'एका वर्षी पाणी कमी येईल म्हणून नऊ वर्षांचा कायदा का सोडायचा ?' सहस्रबुद्धेंचा आग्रही युक्तिवाद, मुंबईला जाऊन चीफ इंजिनि-अरना भेटायचे ठरले. ते गेल्यावर लेख संपवून उठलो. आंघोळ-जेवण करून हमाल पंचायतीच्या बैठकीला गेलो. कंत्राट मिळाल्याने सभासद मंडळी आनंदात होती. सध्या आडतबाजारात आवक म्हणून नव्हतीच. सगळ्यांचीच उपासमार चाललेली. सरकारी गोडाऊन-वर सगळ्यांना पाळीपाळीने काम द्यावे सूचना आली...बैठक बिझिनेस लाईक झाली. संपवून निघालो. वीणा बैठकीला आलेली होती. 'घरी येणार का ?'

'तासाभरात बस आहे. पडतो स्टँड-वरच बाकावर.'

'तुला एस. टी. च्या बाकावरच झोप येणार.'

इतक्यात एक काम आठवले. पिशवी स्टँडवर ठेवून सायकल घेऊन गावात गेलो. काम उरकले. दवाखान्यात थांबलो. भातंबऱ्याचे पाटील डोकावले. म्हणाले, आमच्या भागात अजिबात काम नाही.

पृष्ठ ५५ वर

# मानवबळी

पुण्यापासून चाळीस मैलांवर
घडलेली
एक ऐतिहासिक सत्यकथा

निवेदक : कुश

काही कार्यासाठी मानवी बळी देण्याची प्रथा भारतात पूर्वीपासून चालत आली आहे. वर्तमान पत्रातील बातम्यांवरून ही प्रथा कमी प्रमाणात का होईना पण अजून चालू आहे असे दिसते. बळी देताना श्रीमंतांना गरिबांची, स्पृश्यांना दलित जातीच्या लोकांची आठवण होते, हे पण विविध बातम्यांवरून लक्षात येते. इ. स. १७५१ साली पुण्यापासून सुमारे ४० मैलावर खेड तालुक्यात दावडी या गावात एका मांग जोडप्याचा बळी देण्यात आला. या संबंधीचे मूळ कागदपत्र उपलब्ध आहेत. त्यावरून त्यावेळची सामाजिक परिस्थिती थोडी फार समजू शकते. ही सर्व सत्यकथा पुढे दिली आहे.

दावडी या गावची वस्ती सुमारे तीन हजार आहे. बडोद्याचे माजी संस्थानिक गायकवाड दावडी गावचे पाटील होते. गायकवाडांचे मूळ पुरुष दमाजी हे खंडेराव दाभाडे यांच्या सैन्यात अधिकारी होते. इ. स. १७२० मध्ये मृत्यू पावले. त्यांचे पुत्र पिलाजी यांना गुजराथच्या सुभेदाराच्या हाताखाली एक मानाची जागा देण्यात आली. परंतु त्यांच्या विरुद्ध असणाऱ्या लोकांनी त्यांच्यावर एक खुनी हल्ला करविला व त्यात ते ठार झाले. पिलाजी यांचे पुत्र पमाजी यांना गुजराथमधील बंडाचा बिमोड करण्यासाठी पाठविण्यात आले असताना त्यांनी बडोदे भागावर कब्जा मिळविला. पुढे त्यांनी पानिपतच्या लढाईतही भाग घेतला. पुढे दिलेली घटना त्यांच्याच कारकीर्दीत ते दावडीस असताना घडलेली आहे.

इ. स. १७५१ मध्ये दमाजीराव गायकवाड दावडी येथे एक गढी बांधीत होते. परंतु हे बांधकाम वरचेवर पडू लागले, त्यामुळे त्यांनी दावडीतील एक वतनदार काळू राऊत मांग यास किल्ल्याचे बुरूजाचे पायात बळी देण्यासाठी त्याचा मुलगा चादू व चादूची

बायको या दोघांना देण्यास सांगितले. आपल्या धन्यासाठी काळू मांग स्वतःच आपल्या बायकोसह बळी जाण्यास तयार झाला. परंतु त्यासाठी त्याने काही हक्क मागितले. हे हक्क मुख्यत्वे करून गावातील मांग समाजासाठी होते. त्याने मागितलेले सात हक्क पुढे दिले आहेत.

१. गावातील मांगांचे घरात लग्न झाल्यास नवऱ्यामुलास घोड्यावर बसण्याची परवानगी असावी.

२. गावात नौबत मढवावयाची असल्यास मुलाण्याने म्हैस मारल्यावर तिची कातडी मांगांनी फाडावी आणि मांस मांगांनी घेऊन नौबत कातड्याने मढवून द्यावी.

३. मांगांच्या घरचे जनावर मेल्यास त्याचे मास मांगांना मिळावे व कातडी मांगांना मिळावी.

४. गावात मरीआईची बोळवण केली असता तिची पूजा नैवेद्य मांगांना द्यावा.

५. गायकवाड सरकारच्या गादीच्या रखवालीसाठी पाच मांग ठेवावेत. त्यांचे पोटास सरकारानी द्यावे.

६. मला किल्ल्यात पुरल्यानंतर दर्शनाला नैवेद्य द्यावा. तो नैवेद्य माझे वंशजांनी घेत असावा.

७. भोवतालच्या गावी मांगांच्या लग्नात घोड्यावर बसावयाचा शिरस्ता नाही. त्यामुळे ता अधिकार महार समाज मांगांना गाजवू देणार नाही, तरी सरकारांनी लग्नाचे वेळी मांगांना तो अधिकार गाजविण्यासाठी संरक्षण द्यावे.

दमाजीराव गायकवाड यांनी सर्व गावकरी, थळकरी, देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी व महार यांना बोलावून त्यांची या मागण्यास संमती घेतली. त्या सर्वांची संमती असल्याच्या साक्षी घालून ते वचनपत्र काळू राऊत मांग यास दिले. त्याशिवाय त्याला ५००।– रु. बक्षीस दिले.

हे वचनपत्र व रुपये घेऊन काळू घरी गेला. त्याचा मुलगा चादू यास ही हकीकत कळताच तो फार आकांत करू लागला. मी व माझी बायको बळी जातो. सरकारांनी दिलेले हे मान तुम्ही उपभोगा. माझ्यासारखी आणखी मुले तुम्हाला होतील असे त्याने बापास सांगितले. हे ऐकून काळू अधीकच शोक करू लागला.

तोपर्यंत गावकरी वाजंत्री व पूजा साहित्य घेऊन आले. आपली मुलगी गंगा सासरी आहे, तिला बोलावणे पाठविले आहे. तो येईपर्यंत लोकांनी थांबावे असे त्याने सांगितले. तिची व आपली शेवटची भेट व्हावी अशी इच्छा त्याने व्यक्त केली. परंतु लोकांनी मुलगी येईपर्यंत घरचा सर्व विधी उरकून घेऊ, असे त्याला सांगितले. त्याप्रमाणे त्याला व त्याच्या बायकोला तेल हळद लावून न्हाऊ घालण्यात आले. त्याला काळा पोशाख चढविण्यात आला. त्याच्या बायकोस हिरवे पातळ नेसवन मळवट भरवून, तिचे केस मोकळे सोडले. त्यानंतर दोघांनाही जेऊ घालण्यात आले. मग दोघांच्या पोशाखाची गाठ बांधून त्यांना वाजत गाजत गढीच्या बुरुजापाशी आणण्यात आले. बुरुजा-


जवळ आल्यानंतर काळू रडून माझी मुलगी अजून कशी आली नाही म्हणून शोक करू लागला. काही वेळ सर्वांनी मुलीची वाट पाहिली. परंतु ती येत नाही असे दिसल्यावर काळूने सर्वांना त्यांच्या सात वचनांची आठवण दिली आणि त्यानंतर सर्वांनी ती वचने पिढ्यान पिढ्या पाळण्याचे कबूल केले. त्यानंतर आपल्याला बुरुजात बसवावे, आपली मुलगी आल्यानंतर तिची समजूत घालून तिची चांगली बोळवण करावी आणि माझ्या मागण्या कायम लक्षात ठेवाव्यात असे त्याने सर्वांना सांगितले.

त्यानंतर वाजंत्री वाजवून व तोफा डागून त्या उभयतास गळ्याइतके घालण्यात आले. तोच काळू मांग सर्वांकडे बघून मुलीच्या नावाने आकांत करू लागला. माझे मुलीस तुम्ही काय सांगाल असे म्हणू लागला. त्यावर गावकऱ्यांनी तुझे वंशाचे काही कमी पडू देणार नाही असे वचन त्यास दिले. तोपर्यंत संध्याकाळ होत आली. त्यानंतर चिरा बसविण्याचा हुकूम दमाजीराव गायकवाड यांनी दिला. परंतु चिरा बसविण्यास गवंडी भिऊ लागला. तेव्हा काळू मांगाने त्यास न भिण्यास व बेलाशक चिरा बसविण्यास सांगितले. त्याप्रमाणे चिरा बसविण्यात आला. त्यानंतर त्याचा मुलगा चादू अतिशय शोक करू लागला- लोकांनी त्याची समजूत घालून त्याला घरी पाठविले. पंधरा दिवसांनी काळूची मुलगी गंगा ही सासरहून आली. तिने पण अतिशय आकांत केला. लोकांनी तिचे सांत्वन करून तिची बोळवण केली. काळूचा दिवस थाटाने साजरा करण्यात आला. त्यानंतर किल्ल्याचे काम जोराने सुरू करण्यात आले.

ही गढी अजूनही सुस्थितीत आहे. या गढीच्या आतील इमारत जमीनदोस्त झाली असली तरी गढीचे दोन्ही बुरुज व संपूर्ण भिंत शाबूत आहे. गढीच्या दक्षिण बुरुजाच्या पायथ्याशी दगडास शेंदूर लावला असून दसऱ्याचे दिवशी गावातील मांग समाजातील लोक येथे येऊन त्याची पूजा करतात.

वर दिलेली हकीकत त्या घटनेनंतर सुमारे एक वर्षाने लिहून ठेवण्यात आली आहे. हे सभापत्र (मान्यता पत्र) गुरुवार ७ मे १७५२ रोजी दमाजीराव पिलाजीराव गायकवाड व अनेक वतनदार गावकरी, शेतकरी, पाटील, कुलकर्णी मदार, मांग यांचे समक्ष आहे. असा त्यात उल्लेख आहे.

हे हक्क विशेषतः लग्नात मुलाने घोड्यावर बसण्याचा हक्क गावातील मांग समाजातील लोक उपभोगीत होते असा पुरावा आहे. सुरुवातीला काही वर्षे गायकवाड वरातीसाठी घोडा व संरक्षणासाठी शिपाई पाठवित होते. मात्र या हक्कास बाध आणण्याचा प्रयत्न गावातील महार समाजाने केला असे दिसते. २४ मे १८४९ रोजी अमृता कुमाजी, मुकुंदा, येसू, वगैरे मांग मंडळींनी कंपनी सरकारला केलेला एक अर्ज उपलब्ध आहे. पाच सात वर्षांपूर्वी मांग समाजातील लग्नात नवरा मुलगा घोड्यावर बसवून नेत असताना महा-



**गढीचा दक्षिण बुरूज. या बुरुजाच्या खालील बाजूस असलेल्या दगडास शेंदूर लावतात. याच बुरुजाच्या पायात काळू मांग व त्याची बायको यांचा बळी देण्यात आला आहे.**

रांनी दंगल केली, परंतु गायकवाडांनी मांगांना संरक्षण दिले असा उल्लेख या अर्जात आहे. गायकवाड सरकारांनी गावातील मांगांना दिलेले प्रमुख हक्क या अर्जात पुन्हा नमूद करण्यात आले आहेत. आपले घरी लग्न निघाले आहे. वहीवाटी प्रमाणे आपण नवरा मुलगा घोड्यावर बसवून नेणार आहोत. परंतु गावातील महार मंडळी मारामारी करण्याचा संभव असल्यामुळे संरक्षण मागण्यासाठी अर्ज केला आहे; असे अर्जात म्हटले आहे. या अर्जावर अर्जदार अमृता कुमाजी व मुकुंदा येसू यांनी केलेल्या भाल्याच्या निशाण्या आहेत. या अर्जावर मांगांना वहीवाटी प्रमाणे वागू द्यावे असा सुरुवातीचा हुकूम आहे. परंतु त्याला उत्तर म्हणून मांगांनी आपण आपला हक्क गाजविणार

नाही असे महारास लिहून दिले आहे असा उल्लेख आहे. त्यानंतर निश्चित काय झाले हे कळू शकत नाही.

काळू मांग व त्याची बायको बळी गेल्याच्या घटनेला सुमारे २२० वर्षे होऊन गेली आहेत. गायकवाड सरकार लुप्त झाली आहेत. कायद्याप्रमाणे आता कोणासही घोड्यावर बसता येते. परंतु अजूनही महाराष्ट्रातील बहुसंख्य गावात दलित जातीतील लग्नाच्या मिरवणुकी घोड्यावरून निघताना दिसत नाहीत. मांग समाजात लग्न झाल्यास दावडी येथे नवऱ्या मुलास घोड्यावर बसवून गढीच्या दक्षिण बुरुजापर्यंत आणले जाते. वरील हकीकत दावडी येथील मांग समाजातील वडील मंडळीस सर्व साधारणपणे माहीत आहे तशीच ती गावातील इतरही वयस्कर मंडळीस माहित आहे. दावडी गावात मांगांची अकरा कुटुंबे आहेत. नव बुद्धांची कुटुंबे अर्थातच अधिक आहेत. मात्र तंटा बखेडा दिसत नाही.

वरील सर्व हकीकती वरून दोनशेवीस वर्षापूर्वीची महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती काही अंशी समजू शकते. जाती जातीतील संघर्ष या गोष्टीवरून स्पष्ट दिसतो. सर्व समापत्रात काळू मांगाच्या बायकोचे नाव दिलेले नाही. आणि तिचा उल्लेख पातळ नेसविताना आणि बुरुजात पुरताना असा करण्यात आला आहे. बहुधा जवळच्याच गावात सासरी दिलेली मुलगी तातडीचे बोलाविणे पाठवूही येऊ शकली नाही. या गोष्टी समाजातील स्त्रियांचे स्थान दाखवितात. काळू मांगाने मुख्य मागणी म्हणून लग्नात नवऱ्या मुलास घोड्यावर बसविण्याचा हक्क मागावा ही गोष्ट त्या वेळची मांगांची सामाजिक स्थिती आणि त्या बद्दलचे त्यांना वाटणारे दुःख दाखविते. हा साधा हक्क देखील त्यांना विना हरकत बजावता आला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. तथाकथित मोठ्या लोकांच्या अनेक छोट्या गोष्टी देखील इतिहासात नमूद झाल्या आहेत परंतु दलित समाजातील एका गरीब माणसाचा हा त्याग मात्र अज्ञात आहे.

◻ ◻ ◻

(वरील कागदपत्र दावडी येथील श्री. दादासाहेब शितोळे यांचेमुळे पहावयास मिळाले. मोडी मजकूर वाचण्यासाठी श्री. प. दा. खरे व श्री. ओंकार यांनी मदत केली. छायाचित्रे श्री. शहा यांनी घेतली. या सर्वांचा निवेदक अतिआभारी आहे.)

अरबिंदोंचे जीवन, तत्त्वज्ञान
आणि त्यांचा आश्रम
या सर्वांचा एकत्रित परिणाम
तेथील आश्रमवासीयांवर कसा
होतो आहे या दृष्टीने श्री. प्रभाकर
पेंढारकर यांनी घेतलेली महेंद्राची
ही मुलाखत फार बोलकी आहे.

# अरबिंदोश्रम

आमच्या गावात पहाण्याजोगं काही नाही.

छोटसं गाव, भरपूर दारिद्र्य, चार-दोन मोठी चर्च, समुद्रकिनारा. बाकी इथं काही नाही.'

'पण मी येथल्या आश्रमाबद्दल खूप ऐकलंय् !'

'हा, हा, तुम्हाला तो आश्रम पहायचा असेल तर तिकडं जाता येईल. अरविंदांची समाधी तेथे आहे. थोडा अधिक वेळ असेल तर गावापासून दहा मैलावर असलेल्या अरव्हिलोला देखील भेट देता येईल."

'तुम्ही कधी गेला होता तिकडे ?'

'फक्त एकदाच ! आमच्या मिल-मधल्या काही लूमचे सुटे भाग त्यांच्या वर्कशॉपमध्ये तयार होतील का ह्याची चौकशी करायला गेलो होतो ?'

'मग ?'

'तेथल्या वर्कशॉपमधल्या एका माणसाला विचारलं,' इथं इनचार्ज कोण आहे ?'

म्हणाला, 'कोणी नाही, सगळे सारखेच इथं !'

कोणी धड उत्तर देत नाही. ह्या अरव्हिलोमध्ये बरेचसे फॉरेनर्स आहेत. तेथल्या झोपड्यात रहातात. एक बाई दोन दोन पुरुषाबरोबर रहाते. For them, sex is an urge, just like hunger or thirst.

हे पहा, तुम्ही फार भाविक असला तर संध्याकाळी आश्रमात जाऊन समाधीला नमस्कार करा आणि सरळ माझ्या घरी या.

We will have a glass of drink !'

संध्याकाळी काम संपल्यावर एखाद्या स्वच्छ हॉटेलच्या शोधात आम्ही पांडेचरीच्या रस्त्यातून हिंडत होतो. कुणीतरी सुचवलं. एवीतेवी आश्रम पहायचा आहे. आश्रमातच जेवायला जाऊ.

चौकशी करत गव्हर्नरच्या बंगल्याशेजारी आश्रमाच्या भोजनालयात पोहोचलो. तेथे समजले की जेवणाकरिता कुपन्स विकत घेतली पाहिजेत. आणि ती मिळायचे ठिकाण तेथून दहा एक मिनिटांच्या अंतरावर आहे.

वेळ रिकामाच होता.

आम्ही कुपन्सच्या शोधार्थ निघालो.

दहा एक मिनिटानंतर ह्या ऑफिसचा शोध लागला.

एक छोटसं घर. सफेद रंगवलेलं. इतर घरासारखंच ! बाहेर ऑफिसचा बोर्ड नाही. मोक्षाच्या शोधार्थ ह्या आश्रमाकडे येणाऱ्याचे पहिले पाऊल जेवणाच्या कुपन्सच्या शोधार्थ पडावे अशी खास आश्रमीय व्यवस्था केलेली दिसत होती.

'नमस्कार बसा. काय हवं होतं आपल्याला ?'

एक तरुण, पंचवीशीतला, उंच सडसडीत. केस बारीक कापलेले. शर्ट आणि आखूड अर्धी विजार. चेहऱ्यावर नम्रता. इंग्रजीत हलक्या आवाजात विचारत होता.

'कुपन्स हवी होती जेवणासाठी.'

'पण अशी एका जेवणाची कुपन्स इथं मिळत नाहीत.

दिवसाचं कुपन मिळतं. ब्रेकफास्ट, लंच आणि डिनरचं एक कुपन !'

सकाळी उठून न्याहरीला, आणि दुपारी काम सोडून जेवणाला आश्रमात येता येणं शक्य नव्हतं. तेव्हा कुपन्स् घेण्याचा विचार बारगळला.

आमच्यापैकी कुणीतरी विचारलं, 'इथं आश्रमात रहाण्यासाठी कुणाला प्रवेश मिळू शकतो ?'

'पाहुणे म्हणून इथं कोणीही येऊ शकतो हवे तितके दिवस राहू शकतो. त्यांच्याकरिता गेस्ट-हाऊस आहे.

आश्रमीय म्हणून रहायला यायचं असेल तर मात्र त्याकरता वेगळे नियम आहेत. माताजी अशा आलेल्या अर्जातून निवडक लोकांनाच परवानगी देतात.'

'माताजींची भेट होऊ शकेल का ?'

'माताजींचं दर्शन वर्षातून चार


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन
गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०.

वेळाच होतं. इतर वेळी भेट कठीण आहे.'

उगीच उपचार म्हणून विचारायचे प्रश्न संपले होते. एखाद्या हॉटेलच्या शोधात निघणे आवश्यक होते.

आम्ही उठणार इतक्यात आमच्यातल्या वयस्क गृहस्थानी विचारलं,

'इथं किती आश्रमवासीय आहेत?'

'जवळ जवळ दोन हजार.'

'आणि एवढ्यांचा खर्च कसा चालतो?

'इथं वेगवेगळी खाती आहेत. फर्निचर, सेंटस्, कागद, कुक्कुटपालन, ह्या सर्वांचं उत्पन्न आणि माताजींना अर्पण होणारं आर्थिक सहाय्य! आश्रमाचा खर्च सत्तरएक लाख रुपये आहे. तेवढा सहज भागतो.'

सत्तर लाख – हा आकडा लहानसहान नाही. पण समोरचा तरुण ज्या सहजतेनं बोलत होता त्यावरून वाटलं की एवढा पैसा प्रतिवर्षी उभा करणं त्यांना कठीण जात नसावं.

'इथल्या आश्रमवासीयांना काही नियमित शिक्षण दिलं जातं?'

'कसलं शिक्षण?'

'अध्यात्मिक शिक्षण. अरविंदोंच्या तत्त्वज्ञानाचं शिक्षण...'

'नाही. तशी जरूरीच नाही, इथला प्रत्येक माणूस एक चालती बोलती प्रयोगशाळा आहे. मनुष्यरूपी प्रयोगशाळा. अनेक गुणांचं, वासनांचं, भावनांचं, इच्छा आकाक्षांचं, पूर्वानुभावांचं, स्वप्नांचं, शक्तिचं एक वेगवेगळं रसायन आहे. ह्या रसायनावर माताजींचं सान्निध्य, फार काय ह्या आश्रमाचं वातावरण परिणाम करू लागतं आणि मग एक अद्‌भूत प्रक्रिया चालू होते.'

'पण हे सारं आपोआप घडतं?'

'ह्या वातावरणात हे सारं खरोखरच आपोआप घडतं.

माताजींची आणि आमची अधून मधून भेट होतच असते. शिवाय प्रसंगानुरुप संदेश माताजी पाठवत असतात. ह्या संदेशावर विचार करावा तेवढा थोडाच असतो.

आणि ह्या पलिकडं सांगतो, मी इथं कुपन्स देतो आहे, तुम्हाला आश्रमाची माहिती सांगतो आहे, हे काम माताजींचंच. हे काम हा त्यांच्या-माझ्यातला दुवा. तारेच्या एका बाजूनं निघालेला विद्युत-प्रवाह आपोआप दुसऱ्या बाजूला पोहोचतो. हे माझं काम त्या तारेसारखं आहे!'

'पण ह्या साऱ्याचा उद्देश काय? काय साधायचं आहे ह्या साधनेतून?'

'तुम्ही अरविंदोंचं प्रतीक चिन्ह नाही पाहिलंत?'

त्यानं आम्हाला भितीवरच्या एका फ्रेमजवळ नेलं.

दोन त्रिकोण, उलट सुलट एकमेकात गुंफलेले. मध्ये एक चौकोन. चौकोनात पाण्याच्या लहरी, त्यावर एक विकसित कमलपुष्प!

तो पुढं सांगू लागला.

'हा त्रिकोण. त्याचं टोक वर आहे. ही मानवाची 'सुपर-कॉन्शशनेस'कडे जाण्याची वृत्ती. ती जागृत करण्यासाठी साधना.

पृष्ठ ४४ वर

# आ ले पा क

■ इंग्लंडमधील न्यूबर्न येथील एका सहा वर्षांच्या विद्यार्थ्याला चावल्याबद्दल प्राथमिक शाळेतील एका शिक्षिकेची नोकरी गेली.

कोणत्या वयाला चावावे हे प्राथमिक ज्ञान इंग्लंडमधल्या शिक्षिकेला नसावे ? शेम शेम.

■ एकमेकाला पाण्यात पाहणारी रशिया आणि अमेरिका ही राष्ट्रे एकमेकांच्या गळ्यात गळा घालू लागली आहेत.

आता बाकीची राष्ट्रे त्यांना पाण्यात पाहतील.

■ नुकत्या झालेल्या खिस्ती साहित्य संमेलनात दलितांवरील अन्याय व अत्याचाराचा निषेध करणारा ठराव झाला. त्या चर्चेच्या वेळी एकाने उठून सांगितले, की ठरावातील 'दलित' हा शब्द काढून टाकून त्याऐवजी 'अल्पसंख्य' असा शब्द घालावा.

म्हणजे दुष्काळाला टंचाई म्हणण्यातला प्रकार.

■ एक नाटचपरीक्षक लिहितात : वेल-मेड प्लेला 'सुघटित नाटक' असा मराठी पर्याय वापरला गेल्याचे मी पाहिले आहे. पण माझ्या मते 'बनावट नाटक' हा पर्याय अधिक चपखल व अर्थपूर्ण ठरेल.

कसा ठरेल ? ताळा करून पाहिलात का हो ? वेल-मेड प्लेला बनावट नाटक म्हणायचे तर बनावट नोटांना वेल-मेड नोटा नको म्हणायला ?

■ तेच नाटचपरीक्षक : 'दिवा जळू दे सारी रात'चा उत्तरार्ध म्हणजेच 'कल्पवृक्ष कन्येसाठी' हे नाटक. मात्र हे नाटक पाहताना वा वाचताना 'दिवा जळू दे सारी रात' माहीत असणे आवश्यक आहे असे मुळीच नाही. उदाहरणार्थ मी 'दिवा जळू दे सारी रात' हे नाटक एप्रिल-मे १९६५ मध्ये म्हणजे सात वर्षांपूर्वी पाहिले असल्याने आता त्यातले काहीही माझ्या लक्षात नाही.

बरंच आहे ते दोस्ता. वीज-कपातीच्या काळात भलती आठवण नकोच.

■ नुकत्या झालेल्या महाराष्ट्र काँग्रेसच्या सर्वसाधारण सभेत पी. के. सावंतांची प्रदेशाध्यक्ष म्हणून फेरनिवड झाली. त्यावेळी यशवंतराव चव्हाण म्हणाले : आज काँग्रेसच्या अध्यक्षांची निवड आपण एकमताने केली. ही गोष्ट काँग्रेसच्या परंपरेला भूषणावह आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

राष्ट्रपती गिरींच्या निवडणुकीनंतर चव्हाण म्हणाले (असावेत): आज

राष्ट्रपतींची निवड आपण एकमताने केली नाही. ही गोष्ट काँग्रेसच्या परंपरेला भूषणावह आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

■ जगात १९७० साली दर मिनिटास एक पुस्तक प्रसिद्ध झाले अशी आकडेवारी युनेस्कोने नुकतीच प्रसिद्ध केली आहे. या वर्षात एकूण ५ लक्ष ४६ हजार पुस्तके प्रसिद्ध झाली.

या सगळ्या पुस्तकांची परीक्षणे माधव मनोहरांनी लिहिली नाहीत हे नशीब समजा.

■ गृहखात्याचे राज्यमंत्री शरद पवार यांनी विधानसभेत सांगितले : बृहन्मुंबईतील गुंडगिरी, चोरटा व्यापार, आणि त्यामुळे होणारा उपद्रव थांबवण्याचे परिणामकारक उपाय केले जातील.

जुळी मुंबई हा त्यातलाच एक उपाय आहे ना.

■ 'सोबत'कारांना लिहिलेल्या एका प्रदीर्घ अनावृत्त पत्रात स्नेहप्रभा प्रधान म्हणतात : सारेच मोटारवाले श्रीमंत नसतात.

सारे श्रीमंत तरी कुठे हो श्रीमंत असतात ?

■ आणखी एक स्नेहप्रभापित: श्रीमंतांच्या हौशी पुरवल्या जातात; गरिबांच्या पोटापाण्याची व्यवस्था होते... आणि या दोहोंच्यामध्ये गळचेपी होते, चिमटा बसतो, अश्रू गळतात ते मध्यमवर्गीयांचे आणि माझ्यासारख्यांचे – जे श्रीमंत नाहीत, गरीब नाहीत, मध्यमवर्गीयही नाहीत.

पण आहेत, असेच ना ?

■ शिक्षण केवळ ज्ञानदान नसून ती एक सामाजिक जबाबदारी आहे असे एक प्राध्यापक म्हणतात.

ते एक पगारी काम आहे असं कुणीच कसं म्हणत नाही आजकाल ?

■ आग्रा येथे इतिहाससंशोधकांचा एक मेळावा नुकताच झाला. अकबराच्या ४०० व्या जयंतीनिमित्त हा मेळावा भरला होता. या मेळाव्यात प्रा. हबीब यांनी एक निबंध वाचला आणि आजवरच्या इतिहासाने रंगवलेल्या अकबरापेक्षा खरा अकबर वेगळाच होता असे सप्रमाण सिद्ध केले.

चला, ऐतिहासिक कादंबरी लिहायला आणखी एक विषय मिळाला.

■ एक बातमी : मुंबई महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने स्वत:साठी १२०० रुपये किंमतीची एक खुर्ची नुकतीच विकत घेतली. या खर्चिक (आणि खुर्चिकदेखील) अधिकाऱ्याचे नाव गुळगुळे असे आहे.

नाव गुळगुळे आणि १२०० रुपयांची खुर्ची, कससंच वाटतं, नाही ?

■ जोवर जगण्यासारखे काही आहे तोवर जगण्यात मौजच आहे.

■ बायका पुरुषी झाल्या तर आम्ही पुरुष गुरख्यांनी विणलेले स्वेटर घालू ! ◻

## मिशी आणि नोकरी

पुरुषांना सर्वसामान्यपणे मिशी असते. कधी ती दिसते तर कधी ती दिसणार नाही अशी काळजीपूर्वक व्यवस्था केलेली असते. पण दिसण्या न दिसण्यापेक्षा ती असते ही गोष्ट महत्त्वाची आहे. काही वेळा तर असे वाटते की पुरुषाचे सारे पौरुष ओठांवरील या दीड-दोन इंची प्रदेशातील केसाळ वाढीतच सामावले आहे. मिशी हसते, मिशी बोलते, मिशी गोंजारते, मिशी टोचते.

डॅनियल झेलची मिशी वरिष्ठांना अशीच टोचली. डॅनियल झेल हा अमेरिकेच्या मियामी राज्यातला एक पोलीस. वय वर्षे सव्वीस. त्याने मिशी ठेवली आणि वाढवली. वाढता वाढता त्याच्या मिशीची टोके तोंडाच्या वाम-दक्षिण कोपऱ्यांवरून चांगली अर्ध्या इंचाहून अधिक खाली झुकली. या बेसुमार झुकावाबद्दल वरिष्ठांकडून त्याला वेळोवेळी सूचना, समज आणि तंबी मिळाली; पण झेलची मिशी मागे हटली नाही. तोंडाच्या कोपऱ्यांवरून होणारा मिशीचा पाव इंच झुकाव पोलिसखात्याच्या नियमात बसत होता; पण झेलच्या मिशीची दोन्ही टोके या नियमाचे बेछूटपणे उल्लंघन करत होती. कितीही सांगितले तरी डॅनियल आपली मिशी कमी करत नाही असे पाहिल्यावर अखेर वरिष्ठांनी त्यालाच नोकरीतून कमी केले.

डॅनियलच्या मते त्याची मिशी नीट आणि सुबक होती. त्याच्या गस्तीच्या विभागात पुष्कळ झोपडपट्या होत्या. मिशांच्या पाव इंचापेक्षा अधिक वाढलेल्या टोकांमुळे झोपडपट्टीतील पोरट्यांना आपण जरबेत ठेऊ शकतो, असे डॅनियलला वाटते. शिवाय साक्षीच्या निमित्ताने पाहण्यात आलेल्या कितीतरी वकीलांच्या आणि न्यायमूर्तींच्या मिशा त्याच्या मिशांपेक्षा चांगल्या लांब होत्या. त्यामुळेच बहुधा, वरिष्ठ बोलले तरी नोकरीतून कमी करण्याच्या टोकापर्यंत ते जाणार नाहीत असे डॅनियलला वाटले असावे.

पण डॅनियलने टोक सांभाळले नाही म्हणून वरिष्ठांनी टोक गाठले. वरिष्ठांचे बिचाऱ्यांचे काय चुकले ? त्यांनी डॅनियलकडे आणि त्याच्या पाव इंच बेछूटपणाकडे दुर्लक्ष केले असते तर डॅनियल मिशीची टोके कुरवाळीत त्यांना खिजवत राहिला असता; पोलिसखात्याचा बालेकिल्ला यशस्वीपणे लढवल्याबद्दल आज डॅनियलचे वरिष्ठ मिशीला तूप लावून आहेत.

—अनंतराव

# पिकासो

## एक आगळे व्यक्तिमत्त्व

सौ. तारा पंडित

जगविख्यात कलाकार पिकासो हे पॅरिसमध्ये इ. स. १९०४ मध्ये स्थायिक झाले. तसे ते १९०० सालापासूनच पॅरिसला येणंजाणं करीत असत. पण कायमचे राहायला आले ते १९०४ मध्येच. त्यांची परिस्थिती त्यावेळी चांगली नव्हती. कारण कलाकाराला कलेच्या उत्पन्नावर जगता येण्याइतपत मिळकत होत नव्हती. त्या काळी कलाकृती विकत घेणारी गिऱ्हाईके बोटावर मोजण्याइतकीच असत. तरीपण रशियात पिकासोच्या कलाकृतींचे चाहते अनेक आहेत. खुद्द लेनिनग्राड येथे त्यांची बत्तीस चित्रे आहेत. शूकिन नावाचे रशियन रसीक गृहस्थ पॅरिसला केवळ चित्रे विकत घेण्यासाठी येत. त्यांनी अनेक कलाकारांची चित्रे विकत घेतली तशी पिकासोचीही घेतली. आणि जेव्हा जेव्हा पिकासोकडून नवनिर्मिती होई तेव्हा तेव्हा त्या कलाकृती बघण्यास व वेळी खरीदण्यासही ते मास्कोहून पॅरिसला येत असत.

पिकासो लहानपणी वडिलांच्या हाताखाली तयार झाले. वडिलांची मूर्ती म्हणजे पिंगट केस आणि भली थोरली दाढी...अगदी डॉन क्विझोटचाच अवतार! पिकासोच्या अगदी उलट. बार्सिलोना येथील अकादमीत चित्रे देण्यासाठी एक महिन्याची मुदत ठेवली होती. पिकासोचे चित्र एका दिवसातच तयार! त्यांचे सामर्थ्यच विलक्षण. त्यावेळीही तो एक असामान्य बुद्धिमत्ता असलेला कलाकार होता. एवढच नव्हे तर वडिलांच्या नजरेखाली त्याला कलेचे उत्तम धडे मिळाले होते. हे शिक्षणच खरं शिक्षण; शाळेत किंवा आकादमीत ते कधीच प्राप्त होत नसतं. खुद्द पिकासोंच्या मते त्यांनी बार्सिलोना अकादमीसाठी तयार केलेलं चित्र हे वडिलांजवळ बसून तयार केलेल्या चित्रांच्या मानाने अगदीच कमी प्रतीचं होतं. स्वतःच्या धंद्यात नैपुण्य मिळवणं अत्यंत महत्त्वाचं असतं हे यावरून सिद्ध होतं.

पिकासोंचा एक मोठा गुण म्हणजे ते स्वतःविषयी कधीच साशंक होत नसत. अत्यंत संशय आणि कमालीची निराशा यांनी पछाडलेला कलाकार म्हणजे जुआन ग्रिस. त्याला सारखं प्रोत्साहन द्यावं लागे. पण पिकासोचं तसं नव्हतं.

मात्र काही काही वेळा ते अजिबातच काम करीत नसत; विशेषत: स्वत:च्या व्यक्तिगत जीवनात काही बदल घडून आला म्हणजे. उदा. त्यांनी ओल्गाबरोबर घटस्फोट घेतला त्यावेळी पेंटिंग अजिबात केलं नाही. अशा वेळी ते काव्यरचनेत काल व्यतीत अरीत असत. अशी त्यांनी खूप काव्ये रचलेली आहेत.

१९१२ ते १९१४ ह्या काळात पिकासोनी उत्तम कलाकृती तयार केल्या. ह्या काळात बहुतेक सर्वच कलाकारांनी –ब्राक, मातिस, आदिंनी आपलं नैपुण्य पणाला लावलं होतं. एवढ्या श्रेष्ठ दर्जाचं काम नंतर पुन्हा दिसलंच नाही. ह्या काळातच पिकासोनी क्युबिझमला जन्म दिला. हा काळ त्या दृष्टिने फार महत्त्वाचा. आज तर त्याचं महत्त्व अधिकच जाणवतं. लोकांना वाटलं होतं हे काम – ही उत्कृष्ट निर्मिती अशीच होत राहील, उत्कृष्टतेचा उच्चांक गाठील...पण महायुद्ध सुरू झालं नि पिकासो आपल्या मित्रमंडळींना दुरावले, एकटे पडले. याच वेळी त्यांनी क्युबिझमचा आविष्कार करीत असतानाच दोन क्लासिकल चित्रेही तयार केली. ह्या पद्धतीनेही आपण समाधानकारक निर्मिती करू शकतो, प्रगत होऊ शकतो याची त्यांना खात्री पटली. ते म्हणाले देखील, ' हीच चित्रे पूर्वीच्या चित्रांपेक्षा चांगली वाटतात. ' पण त्यांच्या ह्या प्रगतशील व असामान्य कलाकृतींमुळेच त्यांचे चित्रकार मित्र त्यांना सोडून गेले. तशा भेटी अनेकदा झाल्या. परंतु मैत्री उरलीच नाही. आत्मीयतेचे धागे तुटून गेले !

पिकासोनी फार मोठ्या प्रमाणावर चित्रनिर्मिती केली आहे. एक चित्र तयार झाले की ते त्यांना खूप आवडतं. हा त्यांचा स्वभाव अगदी लहान मुलासारखाच आहे. मात्र ते आपली चित्रे नष्ट करीत नाहीत. याचं कारण कित्येक वेळा तयार होतानाच ती नष्ट होत असतात. एखाद्या चित्रावर काम करता करता संपूर्ण चित्रच ते बदलून टाकतात. इतकं बदलून टाकतात की केव्हा केव्हा चित्राचा विषय देखील तो उरत नाही. ते म्हणतात – ' चित्र सुरू करताना कलाकाराच्या मनात काहीतरी कल्पना असावी लागते. पण अगदी पुसट कल्पना हवी. परिणामत: निर्माण होणारी कलाकृती चिरकाल टिकून राहते. ' पिकासोनी स्वत: नेमकं हेच साधलं.

रेम्ब्राँ हा पिकासोचा आवडता कलाकार. एकदा ते मित्राजवळ म्हणाले – ' बघ, मी रेम्ब्राँसारखं चित्र काढलंय्. ' आणखी एक चित्र ' बाथशेबा ' म्हणून आहे. त्यात एक स्त्री बसलेली असून दुसरी एकजण तिच्या पायाची नखं काढून देत आहे असं चित्रित केलेलं आहे. काही ' इचिंग्ज ' आहेत, त्यातही रेम्ब्रांच्या हस्तकौशल्याचा भास होतो. पण म्हणून काही त्यांच्या कलाकृती रेम्ब्राँच्या चित्रासारख्याच आहेत असं म्हणता येणार नाही. रेम्ब्राँची तुलना कोणाबरोबरच होऊ शकत नाही. पिकासो देखील स्वतंत्र निर्मिती करणा-

राच कलाकार आहे. सर्व चित्रकारांची समस्या अर्थात् एकच असणार. चित्रकाराला आपल्या भावना व्यक्त करण्याचं साधन म्हणजेच चित्रनिर्मिती. चित्राकृतिद्वाराच आपल्या दृश्य भावना किंवा दृश्य अनुभव यांचा आविष्कार तो करीत असतो. आजच्या काळात आपण असे मानतो की पेंटिंग ही बाह्य जगाची प्रतिकृति नव्हे; उलट चित्रकाराच्या निर्मितीतच बघणाराला बाह्य सृष्टीचं दर्शन होतं. प्रत्येक काळात चित्रकारांनी काढलेली चित्रे त्या त्या काळातील विशिष्ट परिस्थिती कथन करीत असतात. त्या त्या काळातील वातावरण चित्रित करणं हेच प्रामुख्याने चित्रकारांचे उद्देश बनत गेले. उदा. धार्मिक भावना खोलवर रुजलेल्या काळात चित्रकलेचे विषयही त्या काळाला साजेसेच होते. उलट नवजागृतीच्या काळात (Renaissance period) त्या विषयांचा मागमूसही उरला नाही. चित्रांच्या विषयांची निवड अजिबात निराळी ठरली. यावरून हेच स्पष्ट होतं की सृष्टी म्हणजे पेंटिंगसाठी वापरण्याचं मॉडेल नव्हे; उलट चित्रकलेचाच तोही एक आविष्कार होय.

क्युबिझमला नव्याने सुरुवात झाली तेव्हा चित्रांचे विषय अगदी साधे – कप, प्लेट असे असत. कारण गुंतागुंतीचे विषय हाताळणं त्या पद्धतीनुसार एकदम शक्य झालं नाही. ह्या नव्या आविष्कारामुळे अॅब्स्ट्रॅक्ट् पेंटिंग कधीकधी अगदीच निरर्थक वाटतं – कलाकाराच्या मनगटाला मिळणाऱ्या व्यायामापलीकडे त्यात काहीच जाणवत नाही; त्यात एखादी 'प्लॅस्टिकची भावना'सुद्धा व्यक्त झालेली आढळत नाही. साहित्यातून नाही का भावभावनांची उधळण होत? पेंटिंगमध्येही बाह्यसृष्टीची जडणघडण जाणवायलाच हवी.

'एक्स्प्रेशनिझम'चा आविष्कार जर्मनीमध्ये अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आला. खरं तर १७ व्या शतकापासून जर्मनीने चित्रकलेपेक्षा संगीतकलेतच फार मोठं नाव कमावलं आहे. परंतु इ. स. १५०० मध्ये त्या देशात चित्रकलेला नुसता बहर आला होता आणि पिकासोच्या मते तीच जगातील सर्वश्रेष्ठ निर्मिती होय.

पिकासो मूळ स्पेन देशातले पण फ्रान्समध्ये स्थायिक झाल्यामुळे त्यांचा उल्लेख 'फ्रेंच कलाकार म्हणूनच केला जातो.

आफ्रिकन शिल्पकलेने पिकासोना मोहित केलं ते त्यांच्या संस्कृतीमुळे नव्हे किंवा कलेच्या आविष्कारपद्धतीमुळे नव्हे, तर त्यांच्याकडील विविध आकारांच्या वस्तुंमुळे–! ह्या काळ्या लोकांच्या संस्कृतीचं त्यांना मुळीच आकर्षण वाटलं नाही पण त्यांच्या वापरण्याच्या वस्तुच अत्यंत विलोभनीय वाटल्या, एवढं खरं! □ □ □

[ KAHNWEILER IN INTERVIEW : by – NIGEL GOSTLING वरून ]



एस. ए. अय्यर
२० नगीन महाल,
वीर नरिमन रोड, मुंबई २०

## जबानी तिसरी । हप्ता पाचवा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक अशोक शहाणे

संध्याकाळी, म्हंजे पंधरा ऑगस्टला संध्याकाळी, टोकिओ-रेडिओनं अधिकृतपणानं शरणागतीची घोषणा केली.

त्याच दिवशी रात्री दहा वाजता आम्ही परतएकदा चर्चा करायला बसलो. पहाटे तीन वाजले ती चर्चा संपायला ! बंद दारामागं पाच तास सतत चाललेली ती बैठक माझ्या आठवणीतनं निसटणं शक्यच नाही.

अखेर शेवटी नेताजी तयार झाले सिंगापूर सोडून जायला.

प्रश्न होता : कुठं जावं त्यांनी ?

थायलंड ? इंडोचीन ? जपान ? मांचुकुओ ? का चक्क रशियात ?

ठरलं ते असं : मलायाच्या बाहेर जावं हे तर नक्कीच. रशियाच्या कुठल्यातरी भागात. शक्यतर दायरेनला.

**चालू लेखमाला**

# मी नेताजींना पाहिलंय्

थायलंड किंवा इंडोचीनमध्ये जाऊन सापडण्यात काही अर्थ नव्हता. अन् शरणागतीनंतर जपानमध्ये जाणं पण बेकारच होतं.

नेताजी म्हणाले— ह्या निरुद्देश यात्रेचा शेवटचा मुक्काम तूर्त गुप्तच राहू दे. त्याच्याबद्दल आपणपण बोलायला नको. परिस्थिती बघून मलापण त्याच्यात बदल करावा लागेल.

मी मनातल्या-मनात म्हणालो — असं कसं होईल? ध्येयाची दिशा काही मध्याच्या परिस्थितीत बदलणं शक्यच नाही! होकायंत्राच्या सुईसारखी ही दिशापण जन्मापास्नंच पक्की झालेली आहे. ध्येय आहे — भारताचं स्वातंत्र्य! एक्केचाळीस सालच्या सतरा जानेवारीला मोलवी झियाउद्दीन तीर्थयात्रेला निघाला होता — सरळ पश्चिमेला तोंड करून! अन् त्रेचाळीसच्या आठ फेब्रुवारीला ऑर्लांडो माजोट्टा निघाला होता पूर्वेला तोंड करून! पण ते काही असलं तरी झियाउद्दीन काय न् माजोट्टा काय, दोघांचं ध्येय एकच होतं — भारताची बंधनातनं मुक्तता करणं!

कुणीतरी म्हणालं— जपानच्या शरणागतीनंतर तुम्ही जपानी विमानानं जाणं कितपत योग्य ठरेल?

नेताजी तात्काळ हसून म्हणाले होते— Oh, I am a fatalist!

विचित्र भविष्यवाणी!

जाता-जाता आणखी एक गोष्ट सांगतो.

भारतात परतल्यावर मुंबईचे नाथालाल पारेख वारंवार मला एका दिवशीची गोष्ट सांगायचे. नेताजी मुंबईला आले की ह्या नाथालालजींच्याकडेच उतरायचे

गोष्ट आहे खूप दिवसांपूर्वीची. फॉरवर्ड ब्लॉक नुकताच जन्म घ्यायला लागला होता. म्हंजे १९३९ साल.

नेताजी नाथालालजींच्याकडे उतरले होते. कामं उरकता-उरकता खूप रात्र होऊन गेली. जवळ जवळ दोन वाजायला आले होते.

नेताजी म्हणाले — चल नाथालाल! समुद्राच्या काठी जरा पाय मोकळे करून या. नाहीतर झोप नाही यायची.

मरीन-ड्राइववरच्या नाथालालजींच्या त्या प्रचंड प्रासादातनं दोघं बाहेर आले. चालले पायीपायी समुद्राकडे.

पौर्णिमेची रात्र होती. रस्त्यावर अगदी शुकशुकाट होता. समुद्राच्या गर्जना सोडल्या तर बाकी सगळं शांत होतं. लख्ख चांदणं पडलं होतं. निरभ्र आकाश.

नाथालालजींना पक्की आठवण होती, तंद्रीत रस्ता चालता-चालता सुभाषबाबू अचानक थांबले. वरती आकाशाकडे बघत काही क्षण निश्चल उभे राहिले.

मग एकदम हसून म्हणाले— तुला माहित आहे का नाथालाल? कसं मरण आलं तर मी सगळ्यात खूष होईन, माहित आहे तुला? समज, एका विमानात बसून ह्या निळ्यानिळ्या आकाशातनं मी जातोय्!—अचानक एक प्रचंड स्फोट झाला! मी पृथ्वीला अलिंगण देण्याकरता पळत-पळत येत असतानाच सापडलो. पृथ्वीच्या त्या मिठीतच मरण आलं मला! भलतंच नाटचपूर्ण मरण होईल ना रे?

रात्रीचे तीन वाजले होते. आता प्रवासाची तयारी करायला हवी.

ह्या निरुद्देश यात्रेत नेताजींचं सोबती व्हायचं भाग्य कुणाकुणाचं असेल— असा प्रश्न उठला. नेताजींच्याखेरीज ह्या बैठकीला मेजर-जनरल कियानी, अल, गप्पन, कर्नल हबीबुर रहमान, सरकार न् मी एवढे हजर होतो.

पैकी कियानी काही नेताजींच्या-बरोबर जात नाहीत, हे नेताजींच्या शेवटच्या हुकूमनाम्यावरनंच कळलं.

हाच आमच्या सरसेनापतींचा शेवटचा आदेश:

अर्ज-इहुकुमत-इ-आझाद हिंद
टेलि: ५०२१, ५०२२, ५०२३
शोनान (सिंगापूर)
ता. १६ ऑगस्ट १९४५

—हुकुमनामा—

सिंगापूरहून माझ्या गैरहजेरीत मेजर-जनरल एम. झेड. कियानी हे हंगामी आझाद हिंद सरकारचं सर्व प्रकारे प्रतिनिधित्व करतील.

सुभाषचंद्र बोस
राष्ट्रपति
हंगामी आझाद हिंद सरकार

म्हंजे कियानी जात नाहीय्‌त हे पक्कंच. अलगपप्नपण इथंच राहणारय्‌त. सरकारनीपण नेताजींच्याबरोबर जायचं नाही, असं ठरलं.

अचानक कर्नल हबीबुर रहमानकडे वळून नेताजींनी विचारलं— हबीब, तू येतोस का रे माझ्याबरोबर?

हबीब तात्काळ म्हणाला—हो सर!

जणू उद्या सकाळी नेताजींच्याबरोबर फिरायला जायचीच गोष्ट चालल्याय्.

मग नेताजी म्हणाले—बँकॉकडून कर्नल देवनाथ दासला पण बरोबर घ्यावं लागेल.

मेजर स्वामी कोणत्याही क्षणी सिंगापूरला येतील अशी आम्हाला आशा होती. म्हंजे मग ते पण नेताजींच्या ह्या निरुद्देश यात्रेचे सोबती होतील

अचानक माझ्यावर मोर्चा वळवला नेताजींनी.

म्हणाले—म्हणाले अय्यरसाब! काय, वय काय झालं तुमचं?

म्हणालो—अठ्ठेचाळीस चालू आहे सर !

--अरे, म्हंजे तर तू माझ्यापेक्षाही एका वर्षानं लहानच आहेस की ! मग ? तू काय करणारायस ?

मी तात्काळ म्हणालो—मलाया अन् मास्कोत काही फरक नाही. मी येतोय् तुमच्याबरोबर !

तर तसंच ठरलं.

दोन तीन तास अवकाश होता. मग आम्ही निघणार होतो.

एवढ्यात नेताजींना शेवटचे आदेश देऊन टाकायला हवेत, आवराआवर करायला हवी अन् किंचित् विश्रांतीपण घ्यायला हवी.

मला काही नेमकं लक्षात नाही आता. पण त्या रात्री झोपायची फुरसत काही मिळाली नाही नेताजींना. हबीबचंपण तेच. रात्रही राह्यली नव्हती फार म्हणा.

मी खोलीत आलो. अन् निव्वळ दमणुकीनं बिछान्यावर पडलो. कपडे तसेच अंगावर पायात बूटपण तसेच.

अर्धा तासभर झोपलो असेन.

दोन तासांनी आम्ही सगळे विमान तळावर हजर झालो. जे इथंच राहणार होते, ते पण आले होते विमानतळावर. नेताजींना शेवटचा 'जयहिंद' करायला. मेजर जनरल कियानी अन् अलगप्पनपण आले होते.

उन्हानं रणरणणाऱ्या त्या सिंगापूरच्या विमानतळावर, सोळा ऑगस्टच्या साडेनऊ वाजता, लोखंडी जिना चढून नेताजी विमानात गेले. कियानी अन् अलगप्पन खाली उभे होते. कर्नल हबीब, कर्नल प्रीतमसिंग, मी, अन् दुभाषी निगेशी नेताजींच्या मागोमाग गलो.

प्रॉपेलर सुरू झाला. चालायला लागलं विमान पाचेक मिनिटं 'टॅक्सीइंग' करून जिथनं निघालं होतं तिथंच परत आलं एक फेरी घेऊन.

नेताजींनी काय झालं म्हणून विचारलं. लँडिंग गियरच्या ब्रेकमधे काही तरी फॉल्ट आहे असं लक्षात आलंय् असं त्यांना सांगण्यात आलं. आम्हीपण ते ऐकलं. अर्थात लगेच पुढं ते म्हणाले आता दुरुस्ती होऊन जाईल !

झालंही तसंच. दहाला दोनेक मिनटं असतानाच विमानानं सिंगापूर सोडलं. आम्ही मोकळ्या निळ्या आकाशात आलो.

बाँबर विमान होतं. नेताजी पायलटच्या बरोब्बर मागं बसले होते. त्यांचे ते सुपरिचित काळे टॉप बूटस् पिटमधे घुसले होते. नेताजींच्या लगेच मागं बसला होता कर्नल हबीबुर रहमान. त्याच्यामागं मी बसलो होतो पेट्रोल टॅकला खेटून. मग 'फ्युसेलेज' मधे जागा मिळाली होती कर्नल प्रीतमसिंग अन् दुभाषी मिस्टर निगेशींना.

प्लेन हळूहळू वर वर जात होतं.

अचानक माझ्या लक्षात आलं, की थोड्या थोड्या वेळानं तरी पेट्रोल पडतंय् आपल्या अंगावर ! थोड्याच वेळात माझी डावी बाजू पेट्रोलनं भिजून गेली. शर्टची बाही अन् पँट. पेट्रोल टँक लीक होतोय् हे ध्यानात

आलं माझ्या. मला एकदम आठवलं-- जपानी बाँबरमधे सिग्रेट ओढायला काही बंदी नसते. अन् तशी मनाई ह्या विमानात कुठं लिहिलेलीपण दिसेना.

माझ्यापासनं अवघ्या तीन हातावर नेताजी बसलेले होते. अन् ते रोज चार-पाच पाकिट सिग्रेटी ओढायचे. मी मिस्टर निगेशींची नजर पकडली न् त्यांना पेट्रोलबद्दल सांगितलं.

निगेशी पायलटबरोबर जपानींत काय बोलले, मला कळलं नाही. पण मला म्हणाले—ते काही विशेष नाही! पेट्रोल टँकचा एखादा नट ढिला झाला असेल बहुतेक!

तरी ह्या प्रकाराचं महत्त्व त्यांच्या लक्षात आलंय् का नाही, ते पहाण्याकरिता मी त्यांच्याकडं तीक्ष्ण नजरेनं बघितलं. पण जपानी लोकांची तोंडं देवानं अशीकाही बनवलेली असतात, की चेहऱ्यावरनं त्यांच्या मनातली गोष्ट समजायला काही मार्गच नाही!

निगेशींनी अर्थात् स्वतःच हात लांब करून टँकचा एक नट घट्ट करून टाकला. पेट्रोलची पिचकारी बंद झाली. देवानं वाचवलं न् काय!

कुठंच न थांबता आम्ही सरळ नैऋत्यला उडत चाललो होतो. पांचेक तासांनी --म्हंजे तीनच्या सुमारास -- प्लेननं उतरायला सुरुवात केली.

थोडयावेळानं गोल घिरटया घालून विमानानं बँकॉकच्या तळावर पाय टेकले.

बँकॉकला विमानतळावर आमच्याकरता कुणीच वाट पहात नव्हतं. आम्ही येतोय् म्हणून माहितच नव्हतं कुणाला. आय-आय लीगचे बँकॉकचे प्रतिनिधीपण नाहीत न् जपानचं लायाझाँ ऑफिसचंपण कुणी नाही.

नेताजींच्याबरोबर आम्ही प्लेनमधनं उतरलो. समोरच एक लाकडी वेटिंग-रूम होती. तिथं गेलो सगळेच.

इथं दोन तास वाट पहावी लागली. तेवढयात जपानी लोकांनी खबर पाठवली आमच्या तिथल्या कचेरीत.

पाचच्या सुमाराला दोनतीन गाड्या घेऊन मेजर-जनरल भोसले हजर झाले.

नेताजी बँकॉकमधे आलेयत ही बातमी सबंध शहरात पसरली. मग काय, संध्याकाळपासनं रात्रीच्या शेवटच्या प्रहरापर्यंत लोक येत राह्यले नेताजींना भेटायला. सगळेच बँकॉकमधे राहणारे भारतीय लोक. लष्करी न् मुलकी, सगळेच. सगळेच नेताजींना विचारतायत की -- आता काय करणार? कुठं जाणार? स्वातंत्र्य-संग्रम कुठनं न् कसा चालवणार?

नेताजी त्यांच्या एकेका प्रश्नांची उत्तरं देत होते. अजिबात वैतागत नव्हते.

हे सगळं चाललेलं असतानाच फुरसत काढून नेताजींनी मेजर-जनरल भोसल्यांना विचारलं --इथं राणीवहिनीच्या काही मुली होत्या, त्यांची काय सोय झाली?

भोसले म्हणाले -- इथं तर फारशा मुली नव्हत्याच. फक्त तिघीजणीच तर --

त्यांना मधेच अडवून नेताजी म्हणाले

— नाही ! चौघी होत्या ना !

अन् लगेच चारी मुलींची नावं पण सांगितली नेताजींनी.

मग भोसले म्हणाले ——नाही सर ! तिघीच आहेत ! लान्सनायक सुभद्रा जयस्वाल एकटीच निघून गेली सिंगापूरला तिच्या वडलांच्याकडे.

——अच्छा ! तर मग ह्या तिघींची काय व्यवस्था करणाराय् ?

—— त्यांना सुरक्षित घरी जाता येईल अशी काहीतरी व्यवस्था करीन मी.

नेताजी त्यांच्याकडे झुकून म्हणाले— तुम्ही जातीनं बघा. ह्यात काही उणीव व्हायला नको.

रात्री बाराच्या सुमाराला काही खायला आलं. आम्ही सगळ्यांनी लगेचच खाऊन घातलं. कारण लोकांची गर्दी अजुनी होतीच. लोक येतपण होतेच.

खाऊन झाल्यावरपण नेताजी काही अंथरूणावर पडले नाहीत. व्हरांड्यात येऊन बसले. तिथं चाळीसेक अधिकारी त्यांच्याभोवती कोंडाळं करून बसले. नाना गोष्टी होत राहल्या. रात्रीच्या शेवटल्या प्रहरापर्यंत.

पहाटेचे जवळजवळ पाच वाजायला आले होते. मग भेटायला आलेले लोकच म्हणाले — तुम्ही आता थोडी विश्रांती घ्या.

नेताजी व्हरांड्यात टाकलेल्या एका खाटेवर आडवे झाले. जवळच एक सोफा होता. मी त्याचा आसरा घेतला. तेव्हा पहाटेचे पाच वाजले होते !

तासाभरानं माझी झोप मोडली. पहातो तर नेताजींचा बिछाना रिकामा! म्हंजे ते आधीच उठले होते. हा तासभर तरी ते झोपले होते का नाही कोणजाणे !

फटफटायच्या आत आम्ही सगळे तयार झालो. नेताजी, कर्नल हबीबुर रहमान, कर्नल प्रीतमसिंग, कर्नल गुलजारासिंग, मेजर आबीद हुसेन, देवनाथ दास न् मी. प्रत्येकाच्या हातात एकेक लहानशी बॅग न् कमरेला लोडेड रिवॉल्वर !

निरोपाची वेळ आली. नेताजींनी प्रत्येकाला आलिंगन दिलं. नेताजींच्या दोन्ही गालावरनं आसवं गळत होती. जे इतके दिवस त्यांच्या अगदी घनिष्ठ संबंधातले होते, ते सगळे रांगेनं उभे होते. निरोप द्यायला. प्रेमानंदजी, ईश्वरसिंग, पंडित रघुनाथशास्त्री, पी. एन. पिल्ले, स्टेनोग्राफर भास्करन, कॅप्टन रिज्वी. खास मंडळींच्या मागच्या रांगेत संकोचून उभे होते दोघं गडी—— सुनील न् टेबलबॉय काली ! त्यांनाही पुढं बोलावलं नेताजींनी. आलिंगन दिलं सगळ्यांच्यासारखंच. काली रडायलाच लागला लहान मुलासारखा.

सतरा ऑगस्टचा सूर्योदय होत होता. त्या ब्राह्ममुहूर्ताला आम्ही बँकाकच्या विमानतळावर आलो परत एकदा.

सकाळी आठ वाजता आमचा प्रवास सुरू झाला. आता दोन विमानं होती. पहिल्या विमानात नेताजी, हबीब, प्रीतमसिंग, अन् जपानी लायझाँ ऑफिसर ! दुसऱ्यात जपानी इसोदा, मिस्टर हाचिया, कर्नल गुलजारासिंग,

आबीद हुसेन न् देवदास दास. जनरल इसोदा हिकारी किकानचे सर्वोच्च अधिकारी होते.

जपाननं अधिकृत आत्मसमर्पण केल्याची घोषणा झाल्यावर अठ्ठेचाळीस तास होऊन गेले होते. आता आंतरराष्ट्रीय कायदा काय सांगतो, ते मला तरी माहीत नव्हतं. म्हंजे आता जपानी विमानातनं आम्हो जाणं हे बेकायदेशीर असेल कदाचित् !

दहा वाजायच्या सुमाराला दोन्ही विमानं सायगावला येऊन पोचली. तिथं फक्त एकच इसम आमची वाट बघत होता. पुढं जाऊन पाह्यलं तर मिस्टर चंद्रमल. सायगावमधल्या आमच्या इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या वाहतूक खात्याचे सेक्रेटरी. कुठनंतरी त्यांना उडती बातमी लागली होती की आज नेताजी इथं येणार म्हणून. ह्या उडत्या बातमीच्या आधारावरच ते सकाळपास्नं आमची वाट पहात उभे आहेत— बातमी खरी निघाली तर चुकामुक व्हायला नको म्हणून !

वेळ घालवून अजिबातच चालण्याजोगं नव्हतं. विमानतळावर उतरल्या–उतरल्या नेताजींनी जपानी सेनापतींच्या बरोबर सल्लामसलत केली. थोडाच वेळ.

जनरल इसोदा, मिस्टर हाचिया न् एक जपानी स्टाफ ऑफिसरनं एक विमान घेऊन तात्काळ 'दालात्'ला जावं असं ठरलं. 'दालात्' इथनं जवळच होतं. फील्ड मार्शल तेरागुचींचं हेडक्वार्टर्स. फील्डमार्शल तेरागुची म्हंजे पूर्व-आशियातल्या लढाईचे सर्वोच्च अधिकारी.

सध्याच्या परिस्थितीत नेताजींना विमान देऊन किती मदत करता येईल हे ते विचारून येणार होते. आता




तेरागुची मदत करायला किती तयार होतात त्याच्यावर नेताजींनी कुठं जायचं न् काय करायचं हे अवलंबून होतं.

ते तिघंजण निघून गेले. आम्ही एका गाडीनं सायगावच्या एका उपनगरात आलो. श्री. नारायणदासांच्याकडे तात्पुरती व्यवस्था झाली. सायगावमधल्या आय-आय-लीगच्या गृहनिर्माण विभागाचे सेक्रेटरी होते नारायणदासजी.

शहराच्यामधनं धावत चालली होती आमची गाडी. दुपारची वेळ होती. रस्त्यात माणसं अगदीच कमी दिसत होती. सबंध शहरात भलतीच हवा. अन् नाना अफवा. सायगावमधल्या ज्या भारतीयांनी न् इतरांनीपण जपानला मदत केली होती, त्यांच्यावर फ्रेंच लोक परत आल्यावर काय सूड उगवतील--त्याच्याच नाना गोष्टी! निव्वळ ऐकूनदेखील रक्त गोठायला येईल असल्या गोष्टी!

आम्ही येणार आहोत ही गोष्ट शहरात फोडलेली नव्हती. तेच अर्थात् बरं होतं.

एकदाचे आम्ही नारायणदासजींच्या घरी येऊन पोचलो. एक खोली नेताजींना दिली गेली. मी न् आबीद हुसेननं दुसऱ्या खोलीचा कब्जा घेतला. आणखी एका खोलीत हबीब न् देबनाथ दास.

नेताजींनी लगोलग आंघोळ केली अन् ते अंथरुणावर पडले. ताबडतोब झोपही लागून गेली त्यांना. काल रात्रभर डोळ्याला डोळा लागला नव्हता. आता तरी चारपाच तास सलग झोप मिळाली तर ताजेतवाने होऊन जातील ते!

पण ते होणं नव्हतं!

अर्धा तास झाला असेल-नसेल, एवढ्यात एक गाडी येऊन थांबली. जपानी लायाझाँ ऑफिसर मिस्टर कियानो धावतच घरात आले. म्हणाले--अत्यंत महत्त्वाची खबर आहे! जरा नेताजींना बोलवा!

आम्ही काही राजी झालो नाही.

हबीबभाईनं विचारलं—खबर काय आहे ते आधी सांगा!

कियानो म्हणाले--आता इथनं एक विमान सुटणाराय्. त्याच्यात फक्त एकच जागा आहे. नेताजींना त्याच्यातनं जायचं असलं तर लगेच निघायला लागेल त्यांना.

म्हंजे भलतीच महत्वाची खबर आहे! नेताजींनी लौकरात लौकर सायगाव सोडावं असं आम्हाला सगळ्यांनाच वाटत होतं. त्यामुळं नाईलाजानं नेताजींची झोपमोड करावी लागली.

हबीब म्हणाला--जपान्यांनी खबर पाठवल्याय् की आत्ताच इथनं एक विमान सुटणाराय्. त्याच्यात फक्त एकच सीट आहे—

--कुठं जाणाराय् विमान?

—ते मला माहीत नाही. मिस्टर कियानोंनापण ते माहीत नाही असं ते म्हणाले.

—तर मग मिस्टर कियानोंना सांग की हे ज्याला माहीत आहे त्याला पाठवून द्या म्हणावं! विमान कुठं जातंय् ते कळल्याशिवाय मला काहीच सांगता यायचं नाही!

कियानोंचा नाईलाज झाला. ते

निघून गेले. येतांना त्यांची गाडी जितक्या जोरात आली होती, त्याच्यापेक्षा वेगानं गाडी फाटकातनं बाहेर पडली.

अर्ध्या तासानं दुसरी गाडी आली.

ह्या खेपेला जनरल इसोदा, हाचिया न् फील्डमार्शल तेरागुची गाडीतनं खाली उतरले.

म्हंजे तेरागुची दरम्यान दालानूतन इथं आले होते.

ही सगळी मंडळी तडक नेताजींच्या खोलीत शिरली. मी बाहेर व्हरांड्यात उभा होतो. नेताजींनी तेरागुचीशी शेक-हॅंड केला ते तेवढं मी बघितलं. मग दार लावून घेऊन ते पुढच्या कार्यक्रमाची चर्चा करायला बसले.

हबीब ह्या खोलीतच होता. बोलणं काय झालं ते काही मला काहीत नाही. प्रीतमसिंग न् गुलजारासिंग दहा मिनटा-मागंच बाहेर गेले होते. बाहेर म्हंजे शेजारच्या घरात.

जरावेळानं नेताजी एकदम दार उघडून बाहेर आले. आम्हाला सगळ्यांना त्यांनी बोलावलं.

म्हणाले—अत्यंत महत्वाचा एक निर्णय घ्यायचाय्. आत्ताच्याआत्ता !

एकदा आमच्यावरनं नजर फिरवून म्हणाले—अन् प्रीतम न् गुलजारा कुठाय्त ? बोलव त्यांना.

लगेच आम्ही त्यांना बोलावणं धाडलं. नेताजी भयंकर बेचैन झालेले दिसत होते. पाच सेकंद झाले असतील-नसतील, एवढ्यात नेताजींनी परत विचारलं--आले का ते ?

मी म्हणालो--ते आता येतील सर !

वैतागून नेताजी म्हणाले—त्यांना म्हणावं, कपडेबिपडे नीट आहेत का नाहीत ते बघायची काही जरूर नाही ! जसे असाल तसे निघून या ! एक सेकंदपण नाही वाया घालवायला ! महत्वाचा निर्णय घ्यायला पाह्यजे. आत्ताच्याआत्ता ! कम अलॉंग ! हरी अप !

प्रीतमसिंग न् गुलजारासिंग धावत पळतच आले.

नेताजी आम्हाला शेजारच्या खोलीत घेऊन गेले. आपल्या हातानं त्यांनी दार आतनं लावून घेतलं.

खोलीच्या मधोमध ते उभे होते. अन् आम्ही त्यांच्या भोवती.

काही प्रस्तावना न करताच ते म्हणाले—हे बघा, ते म्हणतायत, फक्त एकच सीट आहे प्लेनमध्ये ! म्हंजे गेलं तर मला अगदी एकट्यालाच जावं लागेल. तर मी ही सीट घेऊ का ?

तीन ते चार सेकंद आम्ही सगळे गप्पच राह्यलो ! हबीब, गुलजारा, प्रीतम, आबीद न् मी ! मनातल्यामनात आम्ही सगळे बहुतेक एकच वाक्य म्हणत होतो--देवा ! कसल्या कठीण परीक्षेत टाकलंस हे !

शेवटी आमच्यातल्याच एकाला कसं-बसं बोलायचं सुचलं. शब्द सापडले.

तो म्हणाला—हे कसं काय शक्य आहे नेताजी ? फील्डमार्शल तेरागुची स्वतः इथं आहेत ! त्यांना आणखी एका सीटची सोय करता येत नाही ? तुम्ही सांगा, आणखी निदान एका तरी सीटची व्यवस्था करायला. मनात आणलं तर ते--

त्याला मधेच थांबवून नेताजी म्हणाले--पण हे काही उत्तर नाही माझ्या प्रश्नाचं ! Give me a categorical answer to my simple question. Should I or should I not accept this single seat ? Yes or no ?

प्रश्न तसा साधासोपाच होता, नाही का ? पण उत्तर द्यायलाच हवं ! आपल्या हितचिंतक-अनुयायांचं मत विचारतायत ते.

पण आम्हाला काही साधं सरळ उत्तर नाही देता आलं, आमच्या मनाच्या शंका, दुविधा, द्वंद्व--ह्या सगळ्यांना एका ' हो-नाही 'च्या दोन टोकात नाही बांधता आलं आम्हाला.

आम्ही म्हणालो--आणखी एका सीटकरता परत एकदा प्रयत्न करून बघा तुम्ही. अगदी नाहीच मिळाली, तर मग तुम्ही एकटेच जा.

पण कुठं जात होते नेताजी ? विमान कुठं जाणाराय् ! कोणत्या बाजूला ? आम्ही कुणीच त्यांना ते विचारलं नाही. तेही आपण होऊन काही बोलले नाहीत त्याच्याबद्दल. पण तरी आम्हाला माहीत होतं. अन् हेही माहीत होतं की आम्हाला माहीत आहे हे त्यांना माहीत होतं ! विमान मांचुरियाकडे जात होतं ! दायरेनला !

नेताजी दरवाजा उघडून पलीकडल्या खोलीत गेले--जिथं जपानी सेनापती त्यांच्या उत्तराची वाट बघत होते अधीर होऊन !

नेताजी गेल्यागेल्या आबीद म्हणाला --पण असं अगदी एकट्यानं--

पण वाक्य काही पुरं केलं नाही त्यानं. आबीदभाईच्या मनातली गोष्ट लक्षात आली माझ्या. बरोबर असाच विचार करायला लागला होता त्याला मागं एकदा ! ह्या सायगावहून हजारो मैल पूर्वेला पश्चिमेला असताना ! एकोणीसशेत्रेचाळीसच्या त्या फेब्रुवारीत ! नेताजी जेव्हा तयार झाले होते पाणबुडीतनं निम्म्या जगाला प्रदक्षिणा घालायला त्याहिदिवशी नेताजींनी त्याला प्रश्न विचारला होता --अखेरशेवटी पाणबुडीत एकच सीट मिळाली तर मी काय करू ? एकटाच जाऊ का ?

त्या प्रश्नाचं उत्तर द्यावं लागलं नव्हतं आबीदभाईला. देवाची दया ! दोन जागा मिळाल्या होत्या. ते दोघंही आले होते--एकाच पाणबुडीतनं. नव्वद दिवस पाण्याखाली ! नेताजी न् आबीद हुसेन !

कर्नल गुलजारासिंग क्षीण हसून म्हणाला--पण ते एकटेच बाहेर पडले होते की एकदिवस एल्गिन रोडच्या घरातनं. साथीदार मिळत गेले बरोब्बर ! कधी शिशिर बोस, कधी भगतराम, तर कधी आबीद हुसेन ! हे लोक सोडले तर ते कायमच एकटे--

देवनाथ दासनी थांबवलं त्याला. म्हणाले--नाही, एकटे नाहीत ! देव आहे त्यांना सोबतीला ! त्यानंच चालवलंय् नेताजींना हात धरून !

मनातल्या-मनात मी म्हणालो-- आणखीन्ही आहेत बरेचजण !


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
MALTex BISCUITS
SATHE MALTex BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटें
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

खुदिराम ! बाघा जतीन ! जतीन दास ! वगैरे आहेत अदृश्य !

थोड्याच वेळात नेताजी परत आले. म्हणाले—आणखी एक सीट ते देतायत् आपल्याला ! हबीब, तू असं कर, तू चल माझ्याबरोबर !

गुलजाराला न् मलापण बॅग घेऊन आल्याबरोबर निमानापर्यंत यायला सांगितलं. शेवटच्या घटकेला आणखी-एखादी सीट मिळाली तर !

आम्ही लगेचच निघालो. सगळे तयारीत होतोच. ज्यानं-त्यानं आपापली बॅग घेतली. दोन्ही गाड्या सुटल्या विमानतळाच्या रोखानं. पहिल्या गाडीत नेताजी, हबीब न् मी. दुसऱ्या गाडीत गुलजारा, प्रीतम, आबीद न् देवनाथ.

आम्ही विमानतळावर पोचलो. पण दुसऱ्या गाडीचा काही पत्ता नाही.

पाच मिनटं गेली, दहा मिनटं गेली —पण दुसरी गाडी यायचं काही लक्षण नाही.

सगळेच उतावळे झाले. विमानाचा प्रॉपेलर बऱ्याच वेळापास्नं फिरत होता.

जपानी सेनापति लेफ्टनंट-जनरल शिदेयी ह्याच विमानातनं जाणार होतं. तेपण जवळजवळ दोन तास विमानात बसून होते. नेताजींची वाट बघत.

वीस मिनटं गेली—पण दुसऱ्या गाडीचा काही पत्ताच नाही.

जपानी मंडळी नेताजींना म्हणाली —आणखी वाट बघता यायची नाही.

पण नेताजी अगदी खंबीर. म्हणाले —नाही, त्या गाडीत माझे काही अगदी महत्त्वाचे कागदपत्र आहेत.

सरतेशेवटी दुसरी गाडी आली एक-दाची ! वाटेत काहीतरी गडबड झाली होती.

नेताजींनी अगदी थोडक्यात निरोप घेतला आमचा. प्रत्येकाचा हात धरून झटक्यात ' जयहिंद ' म्हणाले.

का कोणजाणे पण मला वाटलं, ही ह्यांची शेवटचीच भेट आपली ! हे शेवटचंच आपण त्यांना ' जयहिंद ' म्हणतोय् ! असं वाटायला खरं म्हंजे काही कारण नव्हतं ! तरी आवेगानं माझा गळा भरून आला. मी कसंबसं ' जयहिंद ' म्हणालो.

हबीब न् नेताजी जिना चढून गेले. न् लगेचच दिसेनासे झाले विमानाच्या आत.

सुटलं विमान. बरोब्बर सव्वापाच झाले होते. सतरा ऑगस्ट तारीख. वेळ संध्याकाळची.

घिरट्या घालता सायगाव विमान-तळाला प्रदक्षिणा घालून विमान निघून गेलं निरुद्देश यात्रेवर. आम्ही पाचजण उभे होतो विमानतळाच्या निर्जन मोकळ्या मैदानावर. हळूहळू विमानाचा नुस्ता ठिपकाच दिसायला लागला. मग त्याची नुस्ती सावली झाली अन् आकाशाच्या अथांग निळाईत मिसळून गेलं विमान.

परत आलो आम्ही आमच्या तात्पु-रत्या मुक्कामावर. आज सकाळी बँकॉक सोडायच्या आधी आम्ही सातजणांनी एकेक कप कॉफी घेतली होती. त्याच्या-नंतर आमच्यापैकी कुणी एक भांडंभर पाणीपण घेतलं नव्हतं. घरी परत आलो

तर दमणुकीनं शरीर अगदी मोडून पडायला आलं होतं. संध्याकाळी सातच्या सुमाराला जेवण झालं. आम्ही न्याहरी केली! नेताजी न् आबीद-भाईंचा अख्खा दिवसच बहुधा निर्जळी उपासात गेला!

दुसरा दिवस. अठरा ऑगस्ट.

सबंध दिवस वाट बघण्यातच गेला. देवनाथभाई न् मी जपानी किकान ऑफीसमधे गेलो. विनंत्या, विनवण्या, काकुळत्या – सगळं झालं! आमचं एवढंच – आम्हाला घेऊन जायची काहीतरी व्यवस्था करा. त्यांनी फक्त तोंडी सहानुभूती दाखवली. आश्वासन दिलं. नेताजी कुठं गेलेयत, सुखरूप पोचले का नाही – काहीच बातमी लागली नाही. दिवस गप्प बसून राह-ण्यातच गेला.

नंतरचा दिवस. एकोणीस तारीख. परत आम्ही भेटायला गेलो. सायगावात चिक्कार प्लेन्स होती. पैकी एकातनं आम्हाला पाचजणांना नेताजींच्याकडे सोडणं असं काय कठीण होतं? ठीक आहे, जपाननं शरणागति पत्करलेली आहे. पण तरी इतके दिवस तर नेताजींना त्यांनी सढळ हातानं मदत केली होती की! करोडो रुपये देऊन आमच्या आझाद हिंद सरकारला मदत करायची इच्छा होती जपान सरकारची. पण नेताजींच्या आदेशाप्रमाणं आम्हीच दरवेळेला नाही म्हणत होतो. सांगत होतो– भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाकरता आझाद हिंद सरकार अभारतीय लोकांच्याकडनं आर्थिक सहाय्य घेणार नाही.

त्यादिवशी संध्याकाळच्या सुमाराला किकान ऑफीसला अचानक आमची दया आल्यासारखं झालं. निदान मला तरी तसंच वाटलं. सगळेच आमच्याकडे सहानुभूतीनं बघत असल्यासारखं वाटा-यला लागले. तेव्हा काहीच लक्षात आलं नाही. आता कळतंय् की त्यांना बहुतेक एक मर्मभेदक बातमी कळली होती – जी आमच्यापैकी कुणालाच तेव्हा ठाऊक नव्हती.

ह्या एकोणीस तारखेला संध्याकाळी किकान ऑफीसचा एक दुभाषी आमच्याकडे आला. मोडक्यातोडक्या इंग्रजीत म्हणाला— तुमची अवस्था मी समजू शकतो. आम्हालाही फार वाईट वाटतंय्. पण आमचा नाईलाज आहे. तर — एक विमान जपानला जातंय्. त्याच्यात तुमच्याकरता एकच सीट राखून ठेवता आल्याय्. तुमच्यापैकी एकजण येऊ दे.

आम्ही पाचीजण एकमेकाकडे बघा-यला लागलो.

जपानी अधिकारी परत नम्रपणानं म्हणाला— खरं सांगतो, आमचा अगदी नाईलाज आहे. बाकीच्या चौघांना हनोईला पाठवायची खटपट करतोय् आम्ही. सध्या अशाप्रकारं विमानातनं लोक घेऊन जाणं किती धोक्याचं आहे, ह्याचा तुम्हीच विचार करून बघा! आत्मसमर्पणानंतर पाच दिवस गेलेले आहेत मधे!

म्हंजे इलाज नाही, हे उमगलं आम्हाला. पण पाचजणांच्यापैकी आधी कोण जाणार नेताजींच्याकडे?

जपानी दुभाषी परत मोडक्या इंग्रजीत म्हणाला— तुमच्यापैकी कोण जाणार हे अर्थात् तुम्हीच ठरवा आपसात. त्या बाबतीत मी काही बोलणं बरं दिसायचं नाही. मी फक्त एवढंच म्हणेन की असा कोणतरी जाऊ दे— जो सर्वानुमते नेताजींचा आता कसं सांगू मी — वारस असेल !

आम्ही सगळे चरकलोच एकदम ! पण दुभाष्याचं इंग्रजी इतकं मोडकं-तोडकं न् चुकीचं होतं की दुसऱ्याच क्षणी आमच्या ध्यानात आलं — म्हजे ह्याला म्हणायचंय् नेताजींचा उजवा हात !

नेताजींच्याकडे जायची प्रचंड उत्कंठा आम्हाला सगळ्यांनाच होती. अन् आपल्यापैकी प्रत्येकाची स्थिती अशीच आहे, हेही आम्हाला सगळ्यांनाच ठाऊक होतं. त्याच्यामुळं आमच्यातल्या प्रत्येकाचव म्हणणं असं पडलं की, उरलेल्या चौघांच्यापैकी कुणीतरी जावं !

सगळेच मनापासनं बोललेले ! तेव्हा ह्या चर्चेला काही अंत नव्हता ! म्हंजे लॉट्स काढायचे का काय सरतेशेवटी ?

पण नाही ! निवड काही नशिबावर सोडून द्यावी लागली नाही. निवड नीटच झाली. डोकं चालवून.

आबीद म्हणाला— हे बघा अय्यरसाब ! एका गोष्टीचा विचार करून बघायला हवा. आता लढाई संपून गेल्याय्. आम्ही सगळेच सैनिक आहोत. नेताजी मांचुरियात राहोत की मॉस्कोला राहोत की आणखी कुठं राहोत — त्यांचं अगदी पहिलं काम असणार काही कागदपत्र तयार करायचं. प्रचारपत्र तयार करणं, आदेश देणं, राजकीय पत्रं लिहिणं. ह्या कामात आम्हाला बाकबगारी अशी काहीच नाही. ह्या कामात नेताजींना मदत करू शकाल असे आपल्यात एकटे तुम्हीच आहात. पिस्तुलापेक्षा तुमच्या हातात कलमच बरं चालतं. तेव्हा आम्ही चौघं तुम्हाला वाट करून देण्याकरता बाजूला सरतो. काय, तुमचं काय म्हणणं आहे ?

उरलेल्या तिघांनीही होकार दिला. म्हणाले — Pen is mightier than sword !

नंतर चौघांनीही माझे हात धरले. म्हणाले — एक विनंती आहे ! नेताजींची गाठ पडली की लगेच आम्हाला कळवा. अन् त्यांना सांगा, आम्ही त्यांच्याकडे येण्याकरता घटका मोजतोय् !

—अर्थातच !

वचन दिलं मी.

त्यादिवशी रात्री आम्ही शॉर्टवेव रेडिओभोवती कोंडाळं करून बसलो. ए-आय-आरचं न्यूजबुलेटिन चाललं होतं. जपानी सैन्य कुठकुठं शरण गेलं ते सांगत होते. नेताजींची काहीच बातमी त्यांना दिली नाही. बी-बी-सीनंपण काही बातमी सांगितली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही पाचीजण विमानतळावर आलो. ते चौघं हनोईला जाणाऱ्या विमानात चढले. तेच विमान पहिल्यांदा सुटणार होतं. सकाळी नऊला. माझं विमान दहाला

सुटायचं होतं.

थोड्याच वेळात माझ्या ह्या चार मित्रांचं विमान जमीन सोडून वर गेलं. का कोणजाणे, मला बेचैन वाटा याला लागलं. सायगाव विमानतळावर आता मी एकटाच भारतीय. काही कारणानं जपानला जाणारं विमान ह्यांनी सोडलं नाही तर? इथं माझ्या ओळखीचं कुणीच नाही. खिसापण रिकामा. म्हंजे कसं व्हायचं?

मनाची समजूत घालत होतो — व्हायचंय् काय त्यात? आत्ताच जपानच्या दिशेन निघू आपण. वाटेत ताइहोकू. तिथं उतरल्यावर कदाचित् दिसेल की नेताजी न् हबीबभाईपण तिथंच अडकून पडलेयत कुठल्यातरी हॉटेलात. ताइहोकू आहे फोर्मोसांत. तिथं हवा बहुतेकच वाईट असते. ऑगस्ट महिन्यात ह्या वेळेला बहुतेकच उतारू अडकून पडतात तिथं. त्यामुळं ताइहोकूच्या कोणत्यातरी हॉटेलात नेताजींच्याबरोबर आजच दुपारचं जेवण घेणंदेखील काही अशक्य नाही अगदीच!

मग मनातल्या-मनात माझं मलाच हंसू आलं. काय वाट्टेल ते डोक्यांत आपल्या! नेताजी कशाला अडकून पडतायत ताइहोकूत? एव्हांना ते मांचुकुओला पोचलेदेखील असतील बहुतेक. किंवा मॉस्को!

लायाझाँ ऑफिसरच्या बोलण्यानं मी भानावर आलो. म्हणत् होता — चला, तुमचं प्लेन सुटेल आत्ता!

मग विमानाजवळच्याच एका शेड-मध्ये गेलो. निगोशींनी मला एक कप 'ओछा' पाजला. ओछा म्हंजे मीठ घातलेला चहा.

अचानक दिसलं मिस्टर फुकुओकांची माझ्याकडे येतायत्. — मिस्टर फुकुओकांची न् माझी चांगलीच ओळख होती. ते दक्षिण-डोमेईचे मॅनेजर होते. मला ते खूप विषण्ण वाटले गांजलेले. अर्थात् ते अगदीच शक्य होतं— अवघ्या पाच दिवसामागं जपाननं शरणागती पत्करली होती.

जवळ आल्यावर माझ्याशी शेकहँड करून म्हणाले — मिस्टर अय्यर, नेताजींच्याबद्दल मला मनापास्नं वाईट वाटतं!

मी चरकलो!

म्हणालो—का? काय झालं? ते अडकून पडले का वाईट हवेमुळे?

आता फुकुओकांना धक्का बसल्यासारखं झालंसं वाटलं मला. मग स्वत:ला सावरून घेऊन म्हणाले – हो, असाच काहींसा प्रकार आहे. जाऊ दे. पण तुम्ही ह्या बाबतीत इथं बोलू नका कुणाशी!

अन् अचानक त्यांनी घड्याळ पाह्यलं. काहीतरी महत्त्वाच्या कामाची आठवण झाल्यासारखं. अन् घाईघाईनं निघून गेले ते.

अजुनी माझी आपली अशीच समजूत की नेताजींचं विमान नक्कीच अडकून पडलं असलं वाईट हवेमुळं. अजुनी मला पत्ताच नव्हता — कोणतं वज्र पड्यामागं वाट पहातंय् माझी!

थोडाच वेळ गेला असेल. मी

आश्चर्यचकित होऊन पाह्यलं —— नौसेनेचा गणवेश घातलेला एक अधिकारी माझ्याचकडे येत होता. हेही ओळखीचेच निघाले माझ्या. जपानी रिअर-ॲडमिरल चूद्दा, जपानच्या नौसेनेत हे होते नंबर दोनचे अधिकारी. चव्वेचाळीस सालापास्नं ब्रह्मदेशच्या भागात जपानचे एक कर्णधार.

त्यांना मोडकंतोडकं इंग्रजी बोलता यायचं. त्यांचे उच्चार अगदी अस्पष्ट असायचे. मी जपानला जातोय् असं सांगितल्यावर ते डोकं हालवत म्हणाले —— फार वाईट झालं ! आथार्जी वारले !

मी ताठ उभा राह्यलो. माझ्या आठवणीप्रमाणं —— माझे कोरडे पडलेले ओठ जरा हलले. कसंबसं मी म्हणालो —— कायम्हणताय् ! चतर्जी वारले ! ते कसं शक्य आहे ?

——विमान—अपघातात गेले !

मला एकदम आठवलं——चतर्जी सायगावहून रंगूनला परतले होते सोळा तारखेला. त्यांना सिंगापूरला जायचं होतं. म्हंजे बिचारा चतर्जी अशाप्रकारे विमान-अपघातात नाहक मेला !

रिअर-ॲडमिरल चूदा परत फिरत होते. परत काय आठवलं म्हणून माझ्याकडेच वळले. सहानुभूतीनं माझ्या खांद्यावर हात ठेवून कसंबसं म्हणाले—— सहानुभूती !

मी परत म्हणालो——काय म्हणायचंय् काय तुम्हाला ?

——आभार्जी...

——तुम्हाला चतर्जी म्हणायचंय् ? मेजर-जनरल चतर्जी ?

तोपर्यंत आम्ही चालत-चालत विमानाच्याशेजारी येऊन ठेपलो होतो. त्याचवेळी विमानाचा प्रॉपेलर फिरायला लागला.

प्रचंड आवाज न् वाऱ्यामुळं त्यांचं उत्तर काही धड ऐकू आलं नाही. फक्त ——नो, नो——एवढंच कानावर आलं.

——मग कोण ?

प्रॉपेलरच्या आवाजाच्या वर आवाज चढवून मी विचारलं.

——नेताजी !

——नेताजी ?

मी किंचाळलोच !

——हो हो ! नेताजी !

माझ्याइतकच जोरात ओरडून त्यांनी उत्तर दिलं !

अन् काही संशय राहू नये म्हणून पुस्ती जोडली——चंद्र बोस काक्काआ (हिज एक्सलन्सी) !

मला चक्कर आली ! विमानाच्या जिन्याचं रेलिंग पकडलं मी !

रिअर-ॲडमिरलनी माझा हात धरून मला वर ओढून घेतलं न् विमानाच्या आत टाकलं !

तंद्रीत असल्यासारखं मी धप्पदिशी पडलो माझ्या जागेवर. अन् प्लेन सुटलं !

विमानात उतारू होते एकूण पाच. कर्नल टोडा, त्यांचे सहकारी आयोकी म्हणून, एक जपानी नौसेनेचा अधिकारी, एक जपानी वातमीदार, अन् पाचवा मी. शिवाय ' क्रू 'चे चौघं.

कर्नल टोडा हे एक वरिष्ठ लष्करी अधिकारी होते. स्टाफ-ऑफिसर. मला

सुखरूप जपानला घेऊन जायची जबाबदारी त्यांच्यावर होती, असं माझ्या कानावर आलं. पण कर्नल टोडांना काही इंग्रजी येत नव्हतं. म्हणून इंग्रजी येणाऱ्या कॅप्टन आयोकीपण चालले होते टोडांचे सहकारी म्हणून.

विमान मालानं भरलेलं होतं. लहानमोठ्या आकाराच्या नाना पेट्या. त्यांच्यामधनं एक निरुंद वाट ठेवलेली. कुठंकुठं निव्वळ एका फुटाची. ह्याच वाटेनं मी कसाबसा कॉकपिटमधे पोचलो. बसायला जागा मिळाली नाही. कसाबसा हातपाय दुमडून बसलो.

आत्तापर्यंत ह्यांच्यापैकी कुणीच नेताजींच्याबद्दल मला काही म्हणालं नव्हतं. पण विमानतळावर ही दुःखद बातमी रिअर-ॲडमिरलनी मला सांगितल्याय्, हे मात्र त्यांना ठाऊक होतं. त्याच्यामुळं त्यांचं गप्प बसणं हे सहानुभूतीचं होतं.

जवळजवळ दोनतीन तास अगदी गप्पच गेले. माझ्या मनात तेव्हा वादळ घोंगावत होतं. दुपारी एकचा सुमार होता.

कर्नल टोडांनी एक लहानशी टिफिन-बॉक्स काढली. त्यात भात न् तळलेले मासे होते. मला त्यांनी 'खाणार का' म्हणून विचारलं. मी त्यांना थँक्स देऊन नाही म्हणून सांगितलं. त्यांच्या पाण्याच्या बाटलीतलं थोडंसं पाणी तेवढं मी प्यायलो. भूकपण चांगलीच लागलेली होती. पण भुकेपेक्षा जास्ती तहान लागलेली होती. मिळालं असतं तर बाटलीभर पाणीदेखील मी पिऊन टाकलं असतं तेव्हा.

एकदम विमान खाली उतरतंयसं वाटलं. घड्याळाकडं पाह्यलं. पाचचा सुमार होता.

विमान जमिनीला लागलं. आम्ही सगळेच खाली उतरलो. हे कुठं आलोय् आपण? कुणीतरी सांगितलं कँटन विमानतळ म्हणून. कँटन! म्हंजे चिनी प्रजासत्ताकाला जन्म देणाऱ्या सन-यत-सेनची ही कर्मभूमी!




कर्नल टोडांनी मला पत्र्याच्या शेड-मध्ये नेऊन बसवलं. ही शेड म्हंजे भट्टी-सारखी तापलेली ! एका कोपऱ्यात मी गप्प बसून राह्यलो. इतक्या वेळानं मग कर्नल टोडांनी नेताजींच्याबद्दल पहिल्यांदाच मला सांगितलं. कॅप्टन आयाकींनी त्यांचं बोलणं इंग्रजीवरून मला ऐकवलं.

कर्नल टोडांनी मला काय सांगितलं ते तुम्हाला ऐकवायच्या आधी आणखी एक गोष्ट बोलून घेतो.

खरं सांगायचं तर रिअर ॲड-मिरलनी जेव्हा ती भयंकर बातमी सांगितली, तेव्हा माझा त्यांच्यावर विश्वासच बसला नव्हता. पहिल्यांदा प्रचंड धक्का बसला. पण नंतर दिवस-भर ह्याच गोष्टीबद्दल विचार करून करून मला वाटायला लागला—हा निव्वळ जपानी प्रचार असणार बहुतेक. नेताजींच्या हिताकरताच जपानी लोक ही धादांत बनावट गोष्ट सबंध जगात पसरवून ठेवतायत् कारण त्यांनासुद्धा मित्रराष्ट्रांच्यासमोर काहीतरी कैफियत ही द्यावी लागणारच आहे की ! ही बनावट बातमी म्हंजे कैफियतीची प्रस्तावना आहे. '—असं मला मनोमन वाटायला लागलं होतं.

कँटनच्या विमानतळावर पोचल्यावर कर्नल टोडा म्हणाले—तुम्हाला सगळं तपशीलवारच सांगतो. सतरा तारखेला संध्याकाळी नेताजी सायगावहून निघाले, हे तुम्हाला ठाऊकच आहे. त्याच रात्री त्यांचं विमान तुरेनला पोचलं. ती रात्र त्यांनी तिथंच घालवली. दुसऱ्या दिवशी म्हंजे अठरा ऑगस्टला सकाळी ते तिथनं निघाले. अन् संध्याकाळी फोर्मो-सातल्या ताइहोकूला येऊन पोचले. विमानात पेट्रोल भरून घेऊन ते थोडयाच वेळात परत निघाले. पण काही मिन्टातच ते विमान खाली कोसळलं. त्यातच नेताजी—

इथं मी एक प्रश्न विचारला.

—विमान नक्कीच समुद्रात पडलं असेल ?

माझा हा प्रश्न म्हंजे एक गळ होता. मला आशा वाटत होती की ते म्हण-तील—हो. विमानाची काही निशाणी शोधूनही मिळाली नाही. अन् हे उत्तर ऐकलं की मी एक सुटकेचा निःश्वास टाकला असता. मी समजून चाललो असतो की तद्दन बनावट आहे. नेताजी नक्कीच मांचुरियाला निघून गेले अस-तील. त्यांचा माग झाकण्याकरता म्हणून ही गोष्ट !

पण दुर्दैव माझं ! कर्नल टोडांनी माझ्या प्रश्नाचं उत्तर असं दिलंच नाही मुळी !

ते म्हणाले—नाही. विमान काही समुद्रात पडलं नाही. नेताजी अन् हबीब दोघंही जखमी झाले. नेताजींना जास्ती लागलं. शिदेयी तात्काळ मरण पावले. नेताजींना अन् हबीबला इस्पितळात नेलं होतं. आमच्या मेडिकल ऑफिसरनं शक्य ते सगळं केलं. पण वाचवता काही आलं नाही. अखेरशेवटी नेताजी—

मी परत त्यांना मधेच थांबवलं. म्हणालो—हबीबपण वारला का ?

हापण एक ' लीडिंग क्वेश्चन ' होता.

मला आशा वाटत होती ते म्हणतील —हो! कर्नल हबीबुर रहमानपण वारले! नाइलाजानं दोन्ही देहांना अग्नि दिला! पण नाही! इथंच माझ्या पदरी निराशाच आली.

कर्नल टोडा म्हणाले——नाही! हबीब वाचला. त्याच्या जखमा एवढ्या गंभीर नव्हत्या.

आता इतक्या वेळानं माझ्या डोक्यात पहिल्यांदीच प्रकाश पडला! म्हंजे ही काही बनावट गोष्ट नाही! बनावट गोष्ट असती तर विमान समुद्रात पडलं असतं. किमान हबीबभाईपण मेला असता. पण तसं काहीएक झालेलं नाही.

आता मात्र माझे हातपाय पार गळून गेले. तरी मी कबूल करतो—मी काही रडलो नाही. माझ्या डोळ्यातनं पाण्याचं एक टिपूसपण गळलं नाही. ह्याचं काय कारण असेल कोण जाणे! माझा आसवांचा सगळा साठाच सुकून गेला का? की अंतःकरणात आणखी खोल, त्याहूनही खोल मला अजून एक कणभर का होईना पण विश्वास वाटत होता——की नेताजी मरणं शक्यच नाही! निदान भारत स्वतंत्र झालेला न बघता ते काही केल्या मरणं शक्यच नाही!

मला आठवतंय्, डोक्यात प्रचंड कळ मारत होती. डोळ्यांत पाणी नव्हतं. पण माझं डोकं मात्र अगदी फुटायला आलं होतं. दोन्ही हातानी डोकं दाबून मी थोडावेळ गप्प बसून राह्यलो.

मग सगळी ताकद जमा करून उठून उभा राह्यलो.

म्हणालो—ऐका कर्नल! मी अगदी स्वच्छ शब्दात न् मोकळेपणानं बोलणाराय्. भारतातला किंवा पूर्व-आशियातला एकपण भारतीय माणूस तुमच्या ह्या अजब गोष्टीवर विश्वास ठेवणार नाही. तुम्हाला नेताजींच्या मृत्यूचा धडधडीत पुरावा सादर करता येतोय् का? मी जे म्हणतोय्, त्याचं आंतरराष्ट्रीय महत्त्व किती आहे ह्याचा तुम्ही विचार करून बघा. तुम्ही म्हणताय्, कर्नल हबीब अजून जिवंत आहे. तसं असेल तर तुम्ही मला ताबडतोब ताइहोकूला घेऊन चला. नेताजींचा मृतदेह मला स्वतःच्या डोळ्यांनी बघायचाय्. मला ताबडतोब हबीबशी बोलायचंय्. एक लक्षात ठेवा, नंतर असं मात्र म्हणू नका की नेताजींचं प्रेत मला न दाखवताच जाळून टाकलंय् म्हणून! किंवा मग हबीब काही आता कुठं सांपडत नाही म्हणून! ह्या परिस्थितीत मी जपानला जाण्यात काहीच अर्थ नाही. दुनिया उलथ्याची पालथी झाली तरी तुम्ही मला ताइहोकूला घेऊन चला!

——मी शक्य ते सगळं करतो. आम्ही अर्थातच ताइहोकूच्या अधिकाऱ्यांना आधीच आदेश पाठवलेयत——नेताजींचे फोटो वगैरे घेऊन ठेवायला. अन् सगळे पुरावे जतन करून ठेवायला.

——तो फोटो घेऊ देत नाहीतर न घेऊ देत! मी इथनं तडक ताइहोकूला जाणार! अन् तेदेखील ताबडतोब!

मी घड्याळ बघितलं. संध्याकाळचे सहा वाजले होते. सूर्य अजून चांगलाच वर होता. प्रचंड ऊन होतं. भयंकर

उकडत होतं.

विमानानं आकंठ पेट्रोल भरून घेतलं. अन् ते चाललं पूर्वेकडे तोंड करून. रात्री दहाच्या सुमाराला विमान परत खाली उतरायला लागलं. खालीच फोर्मोसा बेट. विमान जमिनीला टेकलं.

आपण ताइहोकूच्या विमानतळावर आलोय् ह्याच्याबद्दल माझ्या मनात कसलीच शंका नव्हती. दिवसभर हात-पाय दुमडून असं बसून राह्यल्यामुळं पातपाय अगदी अवघडून गेले होते. संबंध अंग आंबून गेलं होतं. मी विमानातनं उतरलो. अन् हातपाय पसरून चक्क गवतावर पसरलो.

थोड्यावेळानं पाह्यलं, कर्नल टोडा माझ्याचकडे येत होते.

मी त्यांना म्हणालो––हे ताइहोकूच ना? आता कुठं जायचं आपण?

कॅप्टन आयोकी म्हणाले––नाही, हे ताइहोकू नाही! हे आहे ताइचू!

मी थक्कच झालो. कसातरी कोपरावर भर देऊन मी उठलो.

म्हणालो––का? ताइहोकूला का नाही गेलो आपण?

कर्नल टोडांना माझा प्रश्न सांगून कॅप्टन आयोकी म्हणाले––अडचण होती. आपण तिथंच जायचा प्रयत्न करत होतो. पण नाइलाजानं इथंच उतरावं लागलं.

ताइचूहून ताइहोकू म्हंजे विमानानं शंभर मैल असेल-नसेल. आता अडचण काय असू शकेल ते काहीकेल्या माझ्या डोक्यातच येईना. अन् निव्वळ तेव्हाच काय म्हणून? अजूनदेखील मला त्याचा काही थांगच लागत नाही. मी त्यांना स्वच्छ शब्दात मला ताइहोकूला घेऊन चला असं सांगितलं होतं. ते धुडकावून लावून त्यांनी काही मला तेव्हा ताइहोकूला जाऊ दिलं नाही!

मला सरळ जपानलाच नेण्यात आलं.

तिथं बऱ्याच दिवसांनी हबीबची गाठ पडली. कर्नल हबीबुर रहमाननं मला काय सांगितलं होतं, ते तुम्हाला माहीतच आहे.

जपानमधनं अटक करून मला दिल्लीला आणलं. जपानमधे असताना माझी एकच प्रार्थना होती––नेताजींच्या सगळ्या गोष्टी दुनियेला सांगायच्या. दिल्लीच्या लालकिल्ल्यात साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभं राह्यल्यावर माझी ती इच्छा सफळ झाली. मी माझी प्रत्यक्ष साक्षीदाराची जबानी देऊन टाकली तिथं.

नेताजी जिवंत आहेत का नाही? हा प्रश्न मला खूप लोक विचारतात. ते जिवंत आहेत असा विश्वास माझ्या मनातनं काही वर येत नाही. ते जिवंत असते तर जगात अशी कोणतीच ताकद नाही––जी त्यांना लपवून ठेवू शकेल. नेताजी आपणहूनच लपून राह्यलेयत अन् वेळ आली की ते स्वतःला प्रकट करतील–– असं काही राजकीय पुढारी म्हणत असतात. त्यांच्या ह्या म्हणण्याला मी काहीच किंमत देत नाही. पण सैगल किंवा आबीद हुसेन जेव्हा म्हणतात की नेताजी असेअसे वारले ह्याच्यावर काही आपला विश्वास नाही. म्हणून––तेव्हा माझ्याही मनात दुविधा निर्माण होते. नेताजी कुठंही असू देत. त्यांना माझं नम्र, सश्रद्ध अभिवादन आहे.

**जबानी तिसरी संपली.**

## अरबिंदोश्रम

पृष्ठ १७ वरून

हाच 'सुपर-कॉन्शशनेस' पृथ्वीत उतरला पाहिजे. म्हणजे अवघ्या चराचरास जागृति येईल. म्हणून हा खाली टोक असलेला त्रिकोण.

मधला चौकोन, त्यातल्या पाण्याच्या लहरी ह्या माणसाच्या आशा आकांक्षा आणि त्यातून फुललेले कमल हे अंतिम सत्याचे प्रतीक.

ह्या जागृतीचे साधन योग! पण त्यातले बरेचसे साधक सत्, चित्, आनंद येथपर्यंत पोहोचलेच नाहीत. इंद्रियावर व अतीइंद्रियावर विजय मिळवण्यामध्येच ते कृतकृत्य झाले.. चमत्कार आणि अलौकिकत्व ह्यांनी त्यांनी इतरांना भागले, तसे ते स्वतःही भारले गेले. त्यामुळे ही प्रगती मानवी मनाच्या स्तरावर व स्तरापर्यंतच झाली.

त्या पलिकडे काही आहे. श्री. अरविंदोंनी सांगितलेला तो हा 'सुपर-कॉन्शन्शनेस'! तो साध्य होण्यासाठी सर्वांगीण योग. ही जागृती पृथ्वीत खोलवर पोहोचली पाहिजे; रुजली पाहिजे. म्हणजे ती साऱ्या वातावरणात पसरेल, मनामनावर संस्कार करू लागेल.

त्यासाठी श्री. अरबिंदोनी देह ठेवला. पण त्याचं कार्य चालूच आहे. त्याची तुम्हाला प्रचीती येईल. पण माताजींचं कार्य तरी तुम्हाला दिसावं!'

हा तरुण भारल्यासारखा बोलत होता. डोळ्यात एक विलक्षण चमक होती, तेज होतं.

'माताजींचं वय काय?'

'त्र्याण्णव.'

'आणि, माफ करा, आपण केवळ वादाकरता बोलतो आहोत, उद्या माताजी नाहीशा झाल्या तर ह्या आश्रमवासीयांचं काय होणार? त्यांना ही स्फूर्ती, शक्ती कोठून मिळणार?' आमच्यापैकी एकानं विचारलं.

तरुणाच्या चेहऱ्यावर अस्वस्थता दिसली. पण क्षणमात्रच!

'तो विचार मी का करू! माझं आयुष्य माताजींच्यापेक्षा अधिक आहे हे मी का गृहीत धरू?

९३ व्या वर्षी त्यांचे विचार पहा. ते लिहिणारे हस्ताक्षर पहा. त्यावर वयाचा परिणाम दिसत नाही. वयामुळं विचारात येणारी अस्पष्टता येथे थोडी तरी दिसते आहे का?

माताजींचं शरीर विकल झालेलं वाटतं. पण त्या नवीन देह धारण करत आहेत. त्यांच्या शरीरात घडणारे बदल, आश्रमातर्फे निघणाऱ्या मासिकांतून त्या आम्हाला सांगतात.

हा अंक पहा. वाचा. त्यात माताजींनी एकाच देहात पुनर्जन्माची माहिती स्वानुभवाने दिलेली आहे.'

त्यानं अंक उघडून एक लेख आमच्या हाती दिला. आमच्यापैकी काहींनी त्यावरून नजर फिरवली. वाचण्याइतकी उत्सुकता कोणालाच नव्हती. विसाव्या

शतकात अशा गोष्टीवर विश्वास बसणे कठीण. पाहिलंस करून आम्ही तो अंक त्या तरुणाकडे परत दिला.

आम्ही उठणार इतक्यात एक गृहस्थ पत्र घेऊन आले. ज्यांचं पत्र होतं ते आश्रमवासी कोठे भेटतील म्हणून चौकशी करू लागले. ह्या तरुणानं त्यांना अस्खलीत बंगालीत आवश्यक ती माहिती सांगितली.

ते गृहस्थ गेल्यावर आम्ही उठलो.

'चलतो !'

'परत या. आश्रम पहा. येथलं जेवण तुम्हाला हवं होतं.'

'हो, आम्ही परत येऊ.

—आपलं नाव काय ?'

'महेंद्र !'

'बंगाली ?'

'नाही, गुजराथी.'

'आपण बंगाली छान बोलता.'

'आश्रमात निदान चारपाच भाषा आपोआप येऊ लागतात. इथं बंगाली बरेचसे आहेत. गुजराथीही. गावातल्या लोकांशी तामीळ बोलावं लागतं. थोडा प्रयत्न केला तर फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश...

इथं अनेक देशांचे लोक आहेत. आपण फक्त शिकण्याची उत्सुकता दाखवली पाहिजे.

एका पूर्ण दिवसाची सवड काढून आपण अवश्य या !'

'हो, येऊ. नमस्कार !' ◻ ◻ ◻

त्यानंतर तीन एक दिवसानंतरची रात्र !

जेवणानंतर एकटाच हिंडत होतो. उकाडा होत होता. घामानं अंग चिकचीत झालं होतं. समुद्र किनारी जाऊन शांत बसावं म्हणून मी समुद्राच्या दिशेने चाललो होतो. रस्ता अपरिचित होता. पण पूर्वेला समुद्र आहे एवढे माहीत होते. हॉटेलवर परतायची घाई नव्हती. तेव्हा मनमानेल तसा भटकत निघालो होतो.

एका गल्लीच्या बाहेर पडलो आणि एकदम समोर आश्रमाचे भोजनालय दिसले. मनात आले, आत जाऊन वेगवेगळ्या देशांचे, धर्मांचे, संस्कृतींचे लोक एकत्र कसे भोजन करतात, हे तरी पहावे.

व्हरांडा प्रशस्त होता. पायऱ्याजवळ हवाई चपला, सपाता, कोल्हापुरी वहाणा, खडावा ह्यांचे संमिश्र संमेलन भरले होते. त्यात बूट मात्र नव्हते. माझ्या पायातले बूट मी संकोचाने एका बाजूस ठेवले. आत गेलो.

मोठाला हॉल. डाव्या व उजव्या बाजूस दोन प्रशस्त खोल्या. भिंतींना पांढरा शुभ्र रंग, काल दिल्यासारखा. खाली स्वच्छ फरशीवर छोटचा चटया अंथरलेल्या. पुढे सनमायकाचे छोटेसे चौरंग. त्यावर थाळी ठेवून तीनएकशे लोक मांडी घालुन जेवत होते.भारताच्या सर्व प्रांताचे लोक ह्यात दिसत होतेच. पण त्याचबरोबर गोरेपान, दाढ्या व जटा वाढवलेले काही परदेशीही.

थाळीत ब्राऊन ब्रेडचे तुकडे. दोन मोठाल्या वाटचा. एकात वरण दुसऱ्यात दही ! आज 'मेन्यू' हा दिसत होता. ज्यांचे आयुष्य मटण मासे खाण्यात आणि पाण्याऐवजी वाईन पिण्यात गेले

असेल अशी मंडळीही हे जेवण समाधानपूर्वक, चवीने जेवत होती. जेवणानंतर थाळीतला छोटासा डबा भितीलगतच्या स्टॅण्डवर ठेवत होती. रिकामी थाळी आतल्या स्वच्छता गृहाकडे घेऊन जात होती.

हे डबे कसले ? स्टॅण्डजवळ जाऊन पाहिलं. प्रत्येकाची नावे स्टॅण्डवर लिहिलेली, तशीच डब्यावरही.

A पासून सुरुवात. अर्चना...अरुणा ...बाळकराम ... बेव्हॅलिव्हो ... आणि ह्यात मला एकदम महेंद्र सापडला.

महेंद्राचा डबा स्टॅण्डवरच होता. ह्याचा अर्थ काय, तो जेवून येथून गेला होता की अद्याप यायचा होता ?

मी थांबलो. पाचएक मिनिटे गेली असतील. महेंद्र हातात थाळी घेऊन आला. मला पाहताच त्यानं ओळखल्याचं स्मित केलं. स्टॅंडवरचा डबा घेत त्यानं विचारलं, 'इकडं कसा काय तू ?'

'सहजच. पहावं म्हटलं तुझी भेट होते काय ?'

'नेहमी मी लवकर जेवतो. आज उशीर झाला. केवळ योगायोग !'

'ह्या डब्यात काय आहे ?'

'साखर !

ताटात घेतली की कमी जास्त लागते. कधी मागावी लागते, कधी फुकट जाते. म्हणून ही सोपी युक्ती.

बरं तुझं जेवण ?'

'झालंय् ! आज मला घाई नाही.'

'उत्तम. इथं बसू. !'

आम्ही खोलीच्या एका कोपऱ्यात बसलो.

महेंद्र पाव डाळीत ओला करून खाऊ लागला.

'ह्या जेवणानं पोट भरतं, काम करायला शक्ती येते ?'

हा ब्रेड आमच्या आश्रमाच्या बेकरीत बनवलाय. त्यात ईस्ट आहे. त्यातला कोंडा काढलेला नाही. मोठा पोष्टीक आहे.'

'चव-?'

'ती सवयीनं होते.

मुंबईत बसची वाट पहात तासन् तास उभं रहाण्याची, लोकलमध्ये इतरांच्या घामाच्या वासाची, हॉटेलमध्ये टेबल केव्हा रिकामं होतं ह्याची वाट पहात समोर उभ्या असलेल्या माणसाकडं दुर्लक्ष करून संथपणे खाण्याची सवय होतेच ना. त्यापेक्षा ब्राऊन ब्रेडची चव कितीतरी सहज सवयीची होते.'

'तुला मुंबईचा काय अनुभव ?'

'म्हणजे काय ? मी सिडनॅम कॉलेजचा विद्यार्थी. बी. कॉम् झालो मी तेथून. तुमच्या फिल्मस् डिव्हिजनच्या तारक मेहतांनी लिहिलेल्या गुजराथी नाटकात मी कॉलेजच्या गॅदरिंगला काम केलंय् !'

'मग-?'

'मग काय ?'

'कॉलेज सोडल्यावर काय केलंस ?'

'काय करतात सर्वसाधारण मुलं ? नोकरी. मीही केली.

इंडियन प्लायवूड कंपनीत नोकरी मिळाली. बरा पगार होता. ठीक चाललं होतं.'

'मग ह्या रस्त्याला कसा वळलास ?'

सिडनॅम कॉलेजजवळ अरविंदोश्रम आहे. कॉलेजमधल्या चार वर्षांत ती इमारत तेथे आहे हे कधी माझ्या लक्षातही आलं नव्हतं.

शिवाजीपार्कला प्रधान नावाचे एक इन्कमटॅक्स् कन्सल्टंट रहातात. ओळखतोस ? नाही !

त्यांचा आमचा खूप घरोबा. त्यांच्याकडून एकदा श्री. अरविंदोश्रमाबद्दल ऐकलं. सहज कुतूहल म्हणून एकदा हा आश्रम पहायला गेलो. '

'आणि—?'

'आणि काय, नोकरीचा राजीनामा दिला आणि एक दिवस सरळ इथं येऊन आश्रमात दाखल झालो. '

विलक्षण. काहीतरी आश्चर्यकारक !

सिडनॅम कॉलेजचा विद्यार्थी. मुंबईचं वातावरण. कॉलेजची नाटकं. कदाचित त्यात बरोबर काम करणारी तरुण मैत्रिण, भावी जीवनाची स्वप्नं. एक चांगली नोकरी, मुंबईत स्वतःची जागा....

माणूस सोडतो. अर्थाअर्थी काही कारण नसताना सोडतो...वयाची पंचविशी उलटण्यापूर्वी जीवनाचा हा रस्ता स्वखुषीनं पत्करतो.

विलक्षणच !

महेंद्रानं माझ्याकडं पाहून स्मित केलं.

'तुला विचार कसला पडलाय ?

माताजी इथं कशा आल्या, माहीत आहे ?

माताजींचं लग्न झालेलं. फ्रान्समधल्या एका गावी आनंदात संसार चाललेला. माताजींना चित्रकलेची आवड. एकदा अशाच एका कागदावर काही रेषा काढत होत्या. त्यातून एक चित्र निर्माण झालं. भव्योदात्त हिंदू साधूचं !

ह्या व्यक्तीला भेटायचा माताजींनी ध्यास घेतला. माताजींचे पती आणि माताजी पांडेचरीला आले.

माताजींनी स्वतःला श्रीअरविंदोच्या चरणी वाहून घेतलं. '

मी ऐकत राहिलो.

डब्यातली साखर दह्यात कालवत महेंद्र सांगू लागला,

'समोर बसलाय तो माणूस जर्मन आहे. इथं शेती करतोय आश्रमाची.

त्याला कोणी सांगितलं आश्रमाबद्दल ?

आम्ही आश्रमाची जाहिरात थोडीच करतो आहोत ?

तरीही लोक येतच आहेत. जगाच्या कोनाकोपऱ्यातून.

आश्रमाची संख्या वाढते आहे. आणि मी तुला सांगतो, हे सगळे लोक 'नॉर्मल' आहेत. त्यांच्या क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेले ह्यात बरेचसे आहेत. एम्. डी., एम्. ए. अशा डिग्र्या असलेले अनेक आहेत. तुला किंवा तुझ्या मित्रांना वाटते तसे ते झपाटलेले, वैतागलेले, जीवनाला कंटाळलेले नाहीत. ' ◻

हॉल रिकामा झाला होता.

एक आश्रमवासीय चटयांच्या गुंडाळ्या करत होता. सनमायकाचे चौरंग कोपऱ्यात रचून ठेवत होता. दुसरा जमीन साफ करत होता.

आम्ही उठलो.

महेंद्र म्हणाला, 'मी आत्ता येतो. थांबशील ?'

'हो !'

'मी येईतो भिंतीवरचे बोर्ड वाच. माताजींचे संदेश त्यावर लिहिलेले आहेत.'

हस्ताक्षर सुरेख होतं. फळ्याच्या वरच्या बाजूला खडूनं फुलं काढली होती. त्यात वेगवेगळे रंग भरले होते. त्या संदेशालाच फुलं वाहिल्याचा भास होत होता.

महेंद्राला जेव्हा मी ते म्हणालो, तेव्हा तो म्हणाला,

'पाहिलंस, ह्या वातावरणाचा कसा परिणाम होतो ?'

तू आता जे म्हणालास त्याबद्दल माताजींचे विचार ऐकायचे आहेत ?–'

त्यानं मला दुसऱ्या भिंतीजवळ नेलं.

एका सुरेख निसर्गचित्राखाली माताजींच्या हस्ताक्षरात शब्द होते.

'On the physical plane, it is in beauty that the Devine expresses himself.'

महेंद्र सांगू लागला,

'महत्त्वाची गोष्ट ही की ह्या सर्व गोष्टींना आपण स्वत:ला 'एक्सपोझ' केलं पाहिजे.

उघड्यावर असलेली झाडे पावसाच्या सरीनं भिजून चिंब होतात. सूर्याचे किरण त्यांच्या पानापानावर पडतात. त्या किरणातला जीवनोपयोगी भाग पानांच्या अंतर्भागात जातो. तेथून. तेथून तो पार जमीनीत दडलेल्या मूळापर्यंत पोहोचतो.

ह्यात झाडं काय करत असतात ? काही नाही. ती त्या पावसाच्या सरींना, प्रकाशकिरणांना सामोरी गेलेली असतात. एवढंच आपण करायचं. मनाची खोलता येतील तेवढी कवाडं आपण खोलून टाकायची. बाकी सर्व जे करायचं ते माताजी करत असतात.'

भोजनालय रिकामं झालं होतं. अकरा वाजायला आले असावेत. महेंद्र म्हणाला, 'माझं ऑफिस बंद करायच आहे. येतोस ?'

आम्ही दोघं महेंद्राच्या ऑफिसमध्ये गेलो. महेंद्रानं टेबलावरचे कागद ड्रॉवरमध्ये ठेवले. आतून दोन रुमाल काढत तो म्हणाला,

'हे पाहिलंस, फुरसतीच्या वेळांत मी इथं हे काम करतो.'

त्या कापडावर फुलांचा वेल रेशमी धाग्यांनी भरलेला होता.

'छान आहे.' मी म्हणालो.

'छान नाही. मी शिकतो आहे. इथं रिकामा वेळ दवडायला म्हणजे अपराधी वाटू लागतं. हा सारा वेळ माताजींचा ! असे फुरसतीच्या वेळात जे करतो ते माताजींच्या चरणी अर्पण करतो.'

बोलावं की नाही म्हणून क्षणभर विचार केला.

'पण हा एवढा सारा खटाटोप कशाकरता ? एक केवळ आत्मिक समाधानाच्या मृगजलामागे धावण्यासाठीच ना ?'

महेंद्र रुमाल ड्रॉवरमध्ये ठेवत होता. तो तसाच थांबला. माझ्या नजरेला

ज र मिळवत त्यानं विचारलं,

'हाच प्रश्न मी तुला विचारला तर –?'

मुंबईत डोक्यावर छप्पर असावं आणि स्वतःच्या आणि स्वतःवर अवलंबून असलेल्यांच्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था व्हावी – ही आणि एवढाच तुझ्या साऱ्या खटाटोपांचा उद्देश ना? साऱ्या जीवनाची तुमची हीच ना इतिकर्तव्यता?

ह्या पलिकडं काही मिळवण्याची शक्यता तरी आहे का ह्या खटाटोपांत? सांग ना –! आणि त्यात परत तडजोड. जेव्हा तुझ्या घरच्यांना तू हवा असशील तेव्हा तू नोकरीमुळं असा वणवण फिरत असशील. तुझ्या मुलांना जसं वाढवावसं तुला वाटतं, जे द्यावंसं वाटतं शिक्षण, संस्कार – काय करू शकतोस तू? दैनंदिन गरजा निर्माण करणं आणि त्या पुऱ्या करता करता एक दिवस संपून जाणं हे आज बहुतेकांचं जिणं झालं आहे.

मी इथं सुखी आहे. माझ्या मनाला असली व्यवधानं नाहीत. मनात आलं की फ्रेंच शिकण्याकरता मी दिवसातून तीन तासांचा वेळ काढू शकतो. इथं ह्या ठिकाणी संगीत शिकू शकतो, जगातली कोणतीही भाषा, कला ह्यांचा माझ्या कुवतीप्रमाणं मी मागोवा घेऊ शकतो. आणि ह्या पलिकडं माझ्या स्वतःच्या चिंतनात माझा मी स्वतःला इथं हरवू शकतो. आणि हे सारं इथंच शक्य आहे!'

महेंद्र एकदम बोलायचा थांबला. त्यानं रुमाल ड्रावरमध्ये ठेवले. टेबलवरचं सामान आवरलं. मी मुकाट पहात होतो.

त्यानं ऑफिस बंद केलं. दाराला कुलूप लावलं. मला वाटलं तो आता मला निरोप देईल.

पण त्यानं विचारलं, 'तुझा काय कार्यक्रम?'

'खोलीवर जाणार, बॅग भरणार झोपणार. उद्या सकाळी ७ वाजता गाडी आहे.'

'म्हणजे तू उद्या सकाळी पँडेचरी सोडून चाललास?' महेंद्रानं आश्चर्यानं विचारलं.

'हो, इथलं काम संपलं!"

'पण तू आश्रम पाहिलाच नाहीस आता साडेअकरा वाजून गेलेत. इतर काही नाही तरी निदान आश्रमाची मुख्य इमारत तर पाहून घे चल.

ऑफिसपासून आश्रमाची ही इमारत पाच मिनिटांच्या अंतरावर होती. इमारतीच्या प्रवेश द्वारावर बारा पाकळ्याचे एक पुष्प अंधारातही प्रकाशत होते. हे माताजींचं प्रतीक. आदिशक्ती आणि तिचे अविष्कार.

कमानीच्या आतल्या बाजूस छोट्याशाच जागेत अत्यंत कलात्मक बगीचा. मी पूर्वी कधी न पाहिलेली लालभडक रंगाची टप्पोरी फुलं फुलली होती.

ह्या बगीच्याच्या उजव्या बाजूस एका निष्पर्ण झाडाखाली श्री. अरविंदोंची संगमरवरी समाधी होती. समाधीवर फुलांचं अच्छादन. ही फुलं देखील केरळात ओणम सणानिमित्त फुलांची

रांगोळी काढतात तशी लावलेली. फुलांचं कमळ, त्याला सुरेख वेलबुट्टी !

समाधी भोवती चार पाच स्त्रिया त्या समाधीकडं एक टक पहात बसलेल्या. बाजूला काही बंगाली स्तब्ध बसलेले. दोन परदेशीय आले. त्यांनी समाधी जवळ चर्चमध्ये गुढगे टेकतात तसे गुढगे टेकले आणि भारतीय पद्धतीनं हात जोडून नमस्कार केला. खाली वाकून समाधीवर मस्तक टेकवले आणि पुरी दोन तीन मिनिटं ते तसेच बसून राहिले.

वातावरणात गांभीर्य होते. का कुणास ठाऊक, मला वाटले की श्री. अरविंदोंना जाऊन एक आठवडाही उलटला नसावा. कदाचित रात्रीची ती वेळ असेल, कदाचित तेथल्या मंद दिव्यांच्या, फुलांच्या रांगोळीचा परिणाम असेल, पण वाटले की असे गंभीर आणि तरीही प्रसन्न वातावरण कुठल्याही समाधी भोवती मी अद्याप पाहिले नाही.

महेंद्रानं त्या समाधीवर डोकं ठेवलं. त्याला भोवतालच्या जगाचा विसर पडला. पाच सात मिनिटं तशीच गेली असतील. महेंद्र उठला, माझ्याजवळ येत म्हणाला, 'त्या खिडकीतून प्रकाश दिसतो आहे ना, ती माताजींची खोली.''

आम्ही आश्रमातून बाहेर पडलो. दोघेही न बोलता समुद्राच्या काठाने चालू लागलो. समुद्राच्या लाटांच्या रुपेरी कडा चंद्रप्रकाशात चमकत होत्या. भरतीची वेळ होती. पाण्याचा धोकांर आम्हाला लयबद्ध साथ करत होता.


# राजा शिवछत्रपती

## ब. मो. पुरंदरे

किंमत : तीस रुपये

प्रकाशक

**महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान**

सातारा

एकमेव विक्रेते

**राजहंस प्रकाशन**

पुणे

पंधरा एक मिनिटानंतर समुद्राच्या काठी एका भल्यामोठ्या फाटकाजवळ आम्ही थांबलो.

"हरी"–महेंद्रानं हाक दिली.

हरीनं फाटक उघडलं, आम्ही दोघे आत गेलो.

उजव्या बाजूला एका मोठ्या शेड-मध्ये शंभर खाटा असाव्यात. त्यावर आश्रमवासी झोपी गेले होते.

डाव्या बाजूच्या बैठ्या इमारतीत आम्ही शिरलो. खोलीचं कुलूप काढत महेंद्र म्हणाला, 'मी इथं रहातो."

खोलीत एक साधीशी खाट. भिंतीशी टेबल खुर्ची. टेबलावर मध्यभागी एक फ्रेम. स्त्रीच्या दोन पाऊलांचा तो फोटो होता.

भिंतीवर टांगलेल्या माताजींच्या फोटोखाली माताजींच्या अक्षरात लिहिलेले

O Lord,

Let me be what you want me to be.

–Mother

दुसऱ्या भिंतीवर अशाच फोटोखाली लिहिलेले होते.

Blessed are those

who take a leap towards the future.

साऱ्या ऐहिक सुखाकडं पाठ फिरवून ह्या वयात जीवनाचा हा मार्ग महेंद्रानं पत्करण्याचं उत्तर कदाचित ह्या एका वाक्यात असेल.

आम्ही खोलीतून बाहेर आलो. दूर-वर कुठंतरी बाराचे ठोके पडत होते.

फाटकाजवळ आल्यावर मी महेंद्राला विचारलं,

"परत भेट?"

"होईल ना?" महेंद्र म्हणाला.

"मुंबईला येणार आहेस?"

"नाही.–ती शक्यता नाही. मुंबईत माझं काहीच नाही- मी इथंच सुखी आहे."

"ठीक आहे. मी फिरून केव्हातरी पाँडिचरीस येईन."

"अवश्य ये."


"तू केवळ मनापासून इच्छा कर, बस्, बाकी सगळं माताजी घडवून आणतील."

मी फाटकाबाहेर पडलो. महेंद्रानं हात हालवून निरोप घेतला. फाटक बंद झालं. मी डाक बंगल्याकडं चालू लागलो.

□ □ □

# रक्त नको मज प्रेम हवे






सौ. पुष्पा भावे

'ललितकलादर्श'ने 'रक्त नको मज प्रेम हवे' हे रूपांतरित नाटक नोव्हेंबर महिन्यात रंगमंचावर आणले. 'Satan Never Sleeps' हा इंग्रजी चित्रपट काही वर्षांपूर्वी मुंबईत येऊन गेला होता. आर. डी. कामत या कोकणी नाटककाराने त्याचे स्वैर रूपांतर केले आणि त्यावरून सुरेश खरे या मराठी नाटककाराने 'रक्त नको मज प्रेम हवे' ही नाट्यसंहिता निर्माण केली. वर उल्लेखिलेला चित्रपट मी पाहिलेला होता. त्या चित्रपटकथेचे चांगले नाटक होऊ शकेल यावर माझा मुळीच विश्वास नव्हता. तरी 'रक्त नको मज प्रेम हवे' या नाटकाचा प्रयोग पहावासा वाटला कारण या नाटकाचे दिग्दर्शन कमलाकर सोनटक्के यांनी केले होते. ['माणूस'च्या वाचकांना हे नाव परिचित आहे.] याशिवाय सुहास जोशी या अल्काझी-शिष्याही प्रमुख भूमिकेत दिसणार होत्या.

चिनी लालरक्षकांचे पाशवी राजकारण, दयाभावनेने काम करणाऱ्या रोमन कॅथॉलिक धर्मगुरूंच्या धर्मनिष्ठा, यांच्या पार्श्वभूमीवर या नाटकाचे कथानक निर्माण झालेले आहे. नाटकाची कथा सुलान या भाबड्या, प्रेमवेड्या मुलीची–जो पुरुष शपथेने आमरण ब्रह्मचारी आहे त्यावरील तिच्या निष्ठेची आहे. मूळ चित्रपटकथेत, जो हौसान तिच्यावर बलात्कार करतो त्याला पुढे पश्चाताप होतो आणि सुलानशी तो विवाह करतो असा शेवट आहे; तर मराठी रूपांतरात ज्या तरुण धर्मगुरूवर सुलानचे प्रेम आहे त्याला वृद्ध धर्मगुरू शपथेतून मुक्त करतो आणि पतित सुलानचा तो स्वीकार करतो. कॅथलिक पंथाच्या धर्मगुरूने असे झटकन् शपथमुक्त होणे थोडे अस्वाभाविक वाटते. परंतु मराठी रूपांतरकाराला हे करणे भाग पडते कारण

सानची व्यक्तिरेखा त्याने मुळातच कमी महत्त्वाची मानली आहे. मूळ चित्रपटकथेत, कॅथॉलिक फादरच्या छायेत वाढलेला हौसान लालरक्षक होतो यामागे स्वतःचे व्यक्तित्व सिद्ध करण्याचा यत्न आहे. जी स्त्री आवडली आहे तिला जिंकण्याचा यत्न न करता तिच्यावर बलात्कार करण्यामध्येही स्वतःचे महत्त्व सिद्ध करण्याचा यत्न आहे, लाल रक्षकांमध्ये राहाण्याचा संस्कार आहे. परंतु राजकीय भ्रमनिरास झाल्यावर निराश झालेल्या हौसानला सुलानची सतत आठवण होते. तो परत येतो तो केवळ स्वंरक्षणासाठी नाही; त्याच्या परत येण्यात कॅथॉलिक संस्कारांचा विजय मानला आहे. त्याचबरोबर तरुण धर्मगुरूच्या निष्ठेला निर्माण झालेला मोह दूर होणे मूळ कथाकाराला आवश्यक वाटले आहे. आज मराठी रूपांतर जसे आहे त्या स्वरूपात कथा भावविवश वाटते. अशा या नाटकाला रंगमंचावर उभे करणे अत्यंत अवघड होते. परंतु ' रक्त नको मज प्रेम हवे ' या नाटकाचा प्रयोग पहाताना, कल्पक दिग्दर्शक एखाद्या वाईट नाटकाचाही प्रयोग सुसह्य करू शकतो याचा प्रत्यय आला.

चर्चच्या आत-बाहेर घडणारे नाटक प्रेक्षकांसमोर आणताना विनायक चासकरांच्या देखण्या, उचित नेपथ्याचा दिग्दर्शकाने वेगवेगळ्या तऱ्हेने उपयोग केला होता. ' ललितकलादर्श 'चा शिस्तशीर नटवर्ग, सोनटक्क्यांचे कल्पक दिग्दर्शन, यामुळे नाटक कोठेही न रेंगाळता सादर झाले. मा. दत्ताराम या कसलेल्या नटाने फादर मौन्सीची भूमिका आपल्या अभिनयाच्या नेहमीच्या पठडीबाहेर जाऊन यशस्वी केली. त्यांच्या आवाजाची नेहमीची ' ऐतिहासिक ' फेक क्वचित् जाणवत होती; अन्य भात्यांनी स्वर खालचा लावला होता. सुहास जोशींनी खेळकर सुहान मनमोकळेपणे सादर केली. सध्या मराठी व्यावसायिक रंगमंचावर बऱ्याच दिवसात नवा चेहरा आलेला नाही. सुहास जोशींना संधी दिल्यास त्या उण्या पडणार नाहीत असे वाटते. चंदू डेगवेकर यांनी फादर अॅबिनिओ (सुलानची ज्याच्यावर भक्ती आहे तो धर्मगुरू) उभा करताना त्याचे नायकत्व, गोंधळलेपण यापलीकडे जाऊन धर्मगुरूची निष्ठा व सुलानविषयीचे आकर्षण यातील संघर्ष व्यक्त करण्याचा फारसा यत्न केलेला दिसला नाही. कमलाकर सोनटक्के यांनी स्वतः हौसानची भूमिका कार्यक्षमतेने केली; परंतु लेखनातच ही भूमिका कच्ची असल्यामुळे त्यांना फारसा वाव नव्हता.

या संपूर्ण प्रयोगात पात्रांच्या हालचालींचे संयोजन लक्षणीय होते. विशेषतः हौसान आणि फादर अॅबिनिओचे मुष्टीयुद्ध दिग्दर्शकाने कसून बसविले होते. [ असे प्रसंग मराठी रंगभूमीवर हमखास विनोदी होतात ] दिग्दर्शकाच्या कल्पकतेचा प्रत्यय आला—हौसान सुलानवर बलात्कार करतो तो प्रसंग रंगमंचावर सूचक परिणामकारकतेने उभा करण्यात ! हौसान सुलानला

पळवून नेतो; त्याचे इतर रक्षक रंगीत विजेऱ्यांच्या प्रकाशझोतांनी फादरला वेढून टाकतात; त्याला मद्य प्राशन करावयास लावतात आणि एक रक्षक (अरुण होर्णेकर) अंगविक्षेपांचे नृत्य करतो : या साऱ्या दृश्याने बलात्काराच्या घटनेचे भीषण स्वरूप एका दृश्य प्रतिमेतूनच व्यक्त केले गेले. 'रक्त नको मज प्रेम हवे' हे नाटक चांगले नसूनही कार्यक्षम नटसंच आणि कल्पक दिग्दर्शन यामुळे प्रयोग सुसह्य झाला. या नाटकातील विनोद मात्र फार तमाशाशैलीतले आणि म्हणून या प्रयोगाच्या दिग्दर्शनशैलीशी विसंगत वाटत होते. एवढा एक मतभेदाचा मुद्दा वगळता सोनटक्क्यांचे दिग्दर्शन निर्दोष होते.

प्रश्न फक्त एवढाच उरतो की कमलाकर सोनटक्क्यांसारखा दिग्दर्शक व्यावसायिक रंगभूमीवर असे नाटक घेऊन का यावा? भालचंद्र पेंढारकर हे सतत नव्यांशी संपर्क राखतात त्याबद्दल त्यांना धन्यवाद! पण रूपांतरित नाटक करावयाचे झाल्यास उत्तम नाटकाचे रूपांतर का करू नये? मूळ नाटक समर्थ असले तर एक नवा प्रयोग उभा करायला लागणारी शक्ती, आर्थिक बळ आणि विशेषत: कलावंतांचे कौशल्य कारणी लागले असते. या दृष्टीने, सोनटक्क्यांसारख्या कार्यक्षम दिग्दर्शकांनी स्वत:च चांगल्या नाटकांची रूपांतरे करायला वा करवून घ्यायला पाहिजेत. अलीकडे मराठी रंगभूमीवर हळूहळू मंदीची लाट येत आहे असे ऐकू येते. याचे प्रमुख कारण प्रेक्षकांना मूळ नाटक (स्वतंत्र वा रूपांतरित) किमान दर्जाचे असेल अशी आता खात्री वाटेनाशी झाली आहे. जोपर्यंत मराठी व्यावसायिक रंगभूमी शब्दाश्रयी–संवादाश्रयी नाट्यप्रयोगांच्या आधारे उभी आहे तोपर्यंत नाट्यसंहिता सक्षम असणे अत्यावश्यक आहे. कमलाकर सोनटक्क्यांना पुढील नाटक अधिक चांगले मिळेल अशी आशा करून 'ललितकलादर्श'सारख्या जुन्या जाणत्या संस्थेने नव्या दिग्दर्शकांशी संपर्क ठेवण्याची त्यांची प्रथा चालू ठेवावी. 'झाला अनन्त हनुमन्त' या नाटकाचे अरविंद देशपांड्यानी केलेले दिग्दर्शन, प्रस्तुत नाटकाचे श्री. सोनटक्क्यांनी केलेले दिग्दर्शन ह्या 'ललितकलादर्श'च्या सौहार्दाच्या खुणा आहेत. एका बाजूला व्यावसायिक रंगभूमीच्या इतिहासात स्थान असणाऱ्या 'आनंद संगीत मंडळी'शी असणारे सहकार्य अल्काझीशिष्यापर्यंत पोहोचले या भालचंद्र पेंढारकरांच्या उदार धोरणाचे अभिनंदन!

[एक स्पष्टीकरण : या नाटकातील पात्रांची नावे चिनी पद्धतीने सु–लान, हो–सॉंग अशी असायला हवी होती असे वाटते. परंतु 'ललितकलादर्श'कडून आलेल्या यादीत ती हौसान, सुलान अशी असल्यामुळे तशीच वापरली आहेत.]

□ □ □

## बार्शी तालुका

पृष्ठ ९ वरून

माणसे मेटाकुटीला आली...वेळ झाली म्हणून उठलो. स्टँडवर पोहोचलो. सात-आठ गावची मंडळी भेटली...पाणी नाही, चारा नाही...काम नाही...एक वाजता बस निघाली. आगळगावला उतरलो. चांदगेंच्याकडे चहा झाला. विचारले, 'पाण्याची गाडी चालू आहे ना?' 'केव्हाच बंद झाली.'

'जूनमध्ये तर चालू होती.'

'हो. पण सरकारने दिलेले पाचशे रुपये संपले. मग पंचायत काय करणार?'

मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की पाणी पुरवण्यासाठी खर्चाला कसलीच मर्यादा नाही. पाचशे रुपये खर्च झाले की ग्रामपंचायतीने पंचायतसमितीकडे मागणी करावी. पं. स. ने नि. प. कडे व जि. प. ने कलेक्टरकडे मागणी करावी. येईल तितका खर्च सरकार सोसणार आहे असे आदेश जाहीर केले आहेत.

'पण पंचायत समितीत तर आम्हाला सांगतात की पाचशेच्यावर काही मिळणार नाही.'

महिन्यापूर्वी सोलापूरला जि. प. च्या नियोजन अधिकाऱ्यांशी बोलत होतो. आपल्या जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. अनेक गावी अडचण आहे. तरी या योजनेवर मंजूर रकमेपैकी एक-चतुर्थांशच खर्च घातला. असे का?

'ग्रामपंचायती मागणी करत नसतील. आम्ही काय करावे. ही लोकशाही आहे ना?' नोकरशाहीचे तक्रारवजा गुरगुरणे. पण खरे काय? ग्रा. पं. मागत नाही की वरून मिळत नाही? दुष्काळग्रस्त जनतेला पाणी मिळत नाही एवढे पक्के खरे

चहा घेऊन पुढे निघालो. आगळगावच्या लोकसेवा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. आर. व्ही. कथले यांनी इ. व द. खात्याकडे चिकाटीने प्रयत्न करून विद्यार्थ्यांसाठी धनगरवाडीच्या रस्त्याचे काम सुरू करायला लावले होते. काही लहान मुले परत येत होती. आम्हाला पाहून म्हणाली. 'आम्हाला घेतले नाही बघा.'

'अरे, तुम्ही लहान आहात.'

'त्याला काय करावं? घरी खायला नाही की.'

निरुत्तर होऊन आम्ही पुढे चालू लागलो. पाच वर्षापूर्वी या रस्त्यावर थोडे श्रमदान एका शिबिराच्या निमित्ताने आम्ही केले होते. सध्या १२० मुले आणि २० मुली कामाला लागली होती. 'किती दिवस काम पुरेल?'

'जाईल एक महिना.' कथले सर म्हणाले.

बाकीची विचारपूस करून पुढे निघालो. उंबरगे रस्त्याच्या रुंदीचे काम चालू होते. तीन गावचे सुमारे अठराशे जण कामाला होते. एक बाई म्हणाली, 'बगावो, मी रंडकी. या पोराला घेऊन कामाला आल्ये. तर पोरगा लहान म्हून त्याला न्हाई म्हनत्यात, न् जोडी नाही

म्हून मला बी कामावर घेत न्हाईत.'

अठरा वर्षाखालील मुलामुलींना कामावर घ्यायचे नाही हा केंद्र सरकारचा दंडक आणि गडी-बाई जोडी असल्याशिवाय माती खणायचे काम नीट होत नाही. म्हणून त्या बाईला नकार मिळाला होता. मुलगा पंधरा-सोळाचा. काम करू इच्छिणारा. अशांना खोटे दाखले देण्याची पद्धत सुरू झाली आहे. आम्ही तोच सल्ला दिला. 'अठरा वर्षे वय असल्याचा दाखला सरपंचाकडून नाहीतर पोलीस पाटलाकडून आण.'

तशी आणखी दहा-बारा पोरे भेटली. एक म्हातारा सांगाय लागला, 'ही माझी सून. बगा किती करती. पर वय कमी म्हून तिची हाजरी न्हाई. पर माजं काम बिगीनं उरकावं म्हून घेतले हाताखाली...'

रस्त्याच्या बाजूने उघडा बोडका माळ आणि कोरडी भुसभुशीत होते. काम चार पाच दिवसापूर्वीच सुरू झालेले. पाण्याची गाडी चालत होती. पण निवारा नव्हता. महिना तीन आठवड्याच्या तान्ह्यांना बाभळीच्या झाडाला झोळी बांधून लटकावलेले किंवा काटकीला धोतर अडकवून आडोसा करून जमिनीवर झोपवलेले. तिकडे काम गतीने चालले होते. म्हणूनच धसका बसत होता—संपले चार दिवसात, तर पुढे काय ?

शिवलींग सांगत होता. 'दररोज एक जनावर मरतया. आठवड्याला कार्डाला दोन किलो गहू देत्यात. गावच्या आडाला पाणी मात्र चांगलं लागलं...'

बोलत बोलत उंब्रगे गावाजवळ आलो होतो. राजवाडा (म्हणजे दलित वस्ती) वाटेवरच होता. तिथे एका झाडावर कातडे लोंबकळत होते. 'काल मेलेल्या जनावराचं हाय. लोकांनी मास खाऊन टाकलं...'

गावतळ्याचे काम सुबक झाले होते. पण शिवलिंगची तक्रार — या कामावर मजुरी लई कमी दिली बगा. कमीत कमी ५२ पैसे आणि ९५ पैशाच्यावर कुणालाच मिळाली नाही.

पाटलाच्या घरी वरणकर साहेब मस्टर पूर्ण करायच्या कामात गर्क होते. भोवताली चारपाच रायटिंग मुकादम. तक्रारी—अडचणी—सूचनांची देवाण-घेवाण. बाहेर पडताना एक जण हळूच म्हणाला, 'तलाठी लई पैसे खातो...'

'लेखी तक्रार दे.'

'ती कशी द्यावी ? उद्या आनखी ताप करील...'

आम्ही भानसळ्याचा रस्ता धरला. सगळीकडे सुन झालं. गेल्या पाच-सहा वर्षात या रस्त्याने चार-पाच वेळी तरी सायकलने किंवा पायी गेलो होतो. हादरे सोसत आणि धूळ खात. पण यावेळी चालताना आराम वाटत होता. तीन वर्षाच्या दुष्काळामुळे रस्ते बरीक चांगले झाले...गेल्या सालच्या दुष्काळाचे आभार मानले, पण चालू सालच्या दुष्काळाची मात्र करुणा भाकू लागलो...

'...झाडेसुद्धा कोमेजलेली दिसतात,' रोहिदास सांगत होता. संक्रांतीला पालवी झडल्यावर नवी पालवी येते की खोडच बघावी लागतात कोण

जाणे ?...'

भानसळे गावात शिरलो. एक पोर दिसल.

'पाटील आहेत का गावात.' त्याला हटकले.

'हायती की...ते बगा...'

मी हात केला. पाटील आले. एकदम बांध फुटावा तसे बोलू लागले, 'आडाचं पानी आटलय. बोअरिंगच यंत्र कोपऱ्यापर्यंत आलं न् तेथनच परत गेल... आमच लहान गाव...कोण लक्ष देणार आमच्याकडे. आमच्या क्षेत्रात खडी केंद्र सुरू आहे. पण महिनामहिना पगारी होत न्हाईत. धान्य वेळेवर मिळत नाही. काही जनावरे हिंगोलीकडे पाठवली. बाकीची मेली. गावात आता तेवढी चारपाचच न्हाइली बगा...'

'चला खडी केंद्रावर जाऊ.'

'पानीबिनी घ्यायचं का? घरी चला...'

'नको' त्यांची अडचण आम्ही उमगलो होतो. वाटेत एक पोरगा भेटला. 'पगारी आला.' पाटलांनी वळून आरोळी दिली, 'जडे.. पगारी आला ग...'

वाटेत पाटील सांगू लागले, 'आमचा एवढा मोठा पसारा. बावीस माणसं. घरात दूध न्हाई. तुम्हाला चहा घ्या सुद्धा म्हणता आलं नाही. किती लाचारपणा आला बगा...सरकारनं आमच्या जमिनीच्या तारणावर कर्ज दिलं पाहिजे....'

खडीकेंद्रावर साहेब पगार वाटीत होते. पाच आठवड्यापूर्वीचा पगार चालला होता. 'जिल्हा परिषदेच्या कामाची अशीच अडचण आहे. मस्टर तयार करून डेप्युटी इंजिनिअरने सोलापूरला पाठवायचे. तेथे जि. प. च्या कार्यकारी अभियंत्याने तपासून कलेक्टरकडे पाठवायचे. तेथे तपासून झाल्यावर मग कलेक्टर चेक देणार. तो त्याच मार्गाने परत येणार...बी अँड सी. च्या डेप्युटी इंजिनिअरला पैसे काढायचे अधिकार आहेत. तसे जि. प. च्या डे. इं. ना नाही...'

ही अडचण मागेच लक्षात आली होती. दिवाळीपूर्वी मुंबईत महसूलखात्याचे सचिव सुब्रह्मण्यमसाहेब यांना ती सांगितली तेव्हा ते म्हणाले होते, 'गेल्या वर्षी जि. प. च्या डे. इं. ना आम्ही तसा अधिकार दिला होता. तर सगळ्या जि. पं. नी मिळून राज्य सरकारवर आठ कोटींची लायबिलीटी वाढवली. त्यामुळे यावर्षी नियम बदलावे लागले. पगाराला उशीर त्यामुळे होतो खरा. पण कलेक्टरांना आम्ही सांगितले आहे की विलंब शक्यतो टाळा...'

खडी केंद्र तसे लहान होते. पण उभारलेला निवारा निव्वळ खेळातला वाटत होता. 'असे का?' 'काय करावं? वाऱ्यावादळानं तट्टचा टिकतच न्हाईत...'

'मजुरी किती पडते?'

'गड्याला अडीच, बाईला दोन.'

'पण प्रत्यक्षात?'

काही जणांचे हिशोब पाहिले. कुणाला १-३५ तर कुणाला १-६५. दोघात मिळून पाच फरे आठवड्याला होतात.

पण थोडे जास्त झाले तरी त्याचे माप घेतले जात नाही. म्हणून लोक थोडी कमी खडी फोडतात. 'शिवाय कामही अवघड आहे. तो बघा त्या बाईच्या डोळ्याला खडा लागला. दररोज प्रत्येकाचं छटाकभरतरी रक्त जातं. पट्टी-शिवाय माणूस न्हाई ..'

हे तसे हिवाळ्याचे दिवस. पुढे उन्हाळ्यात खडी तापेल. डोक्यावर निवारा नाही. माणसे कशी काम करणार?

काही जणांना रात्रीच्या सभेचे निरोप देऊन आम्ही पुढे निघालो. मागून काही-जण आले. 'इखन (अवजारे) मिळत नाहीत...तो...त्याचा पोरगा लई तटाल् करतो. परवा याच्या डोक्यात पार घातली. थोडक्यात बचावला. बायांची पण छेड काढतो...'

'पाटलांना सांगितले का?'

'व्हय. ठाण्यावर बी वर्दी दिली. पर काई उपेग न्हाई झाला....'

'पाहू' म्हणून आम्ही पुढे निघालो. डोंगर चढताना रोहिदास म्हणाला, 'जेवायचे का?' मी म्हटले मी जेवलो. तू घे. भाकरीची सुटळी सोडत सोडत तो सांगू लागला, 'सकाळी ती बैठक सगळी तारांबळच झाली....' त्याने एक लांबका तुकडा माझ्या हाती दिला. डोंगरावरच्या झुडपाआड बसून त्याने जेवण उरकले. पुढे निघालो वाटेत एक-जण भेटला, 'मी तुळशीरामाचा भाऊ. खडीचं काम संपलं आता जरा शेताकडं जाऊन येतो. समद्यांना निरोप दिलायस-बाचा...'

पलिकडे समोरच्या डोंगरावर माणसे रांगेने उभे राहून आमच्याकडे पहात होती. तुळशीरामाच्या भावाने हाकारून सांगितले, 'न्हाई, पगाऱ्या न्हाई, आपलं सुरानाभाऊ हाईत...'

वाटेत भिवा भेटला. घरी घेऊन गेला. चहा ठेवला. वडील सांगाय लागले. कधी धंदा करत न्हवतो पगा. पर आता खडी फोडाय जावं लागतं. घरचं हालगट कालच वैरणीपायी विकलं. भिवा जाईचना. धाकला भाऊ न् भन जाऊन इकून आली. तीस रुपयाला... चांगलं तटावट हालगट होतं बगा. त्याच्या डोळ्यांना पाणी आले.

धान्याचे तेच हाल. सटीच्या सणाला नऊ माणसांच्या कुटुंबाला फक्त दीड किलो साखर मिळाली होती. गहू कार्डाला आठवड्याला दोन किलो. तेबी दोन-तीन हेलपाटे केल्यावर. दोन मैलावरील चुंब या गावी धान्य कधी येते न् कधी नाही कळेना म्हणून गाव-कऱ्यांनी मागणी केली की गावाला स्वतंत्र धान्य दुकान मिळावे. दिवाळीच्या वेळेला गावकऱ्यांनी तहसील कचेरीवर मोर्चा नेला होता. कुणीतरी सांगितले की काँग्रेसचा झेंडा लावा म्हणजे लवकर काम होईल. त्यांनी तसे केले. लगेच आश्वासन मिळाले पण दीड महिना होऊन गेला तरी दुकान मंजूर झाले नाही. एकजण म्हणाला, 'आमच्या गावकऱ्यांनी उगीच धर-सोड केली बघा. आपला लाल बावटा सोडून कशाला तो तिरंगी घेतला?' मी न ऐकलेसे करून जनावरांचे विचारले. काही थोडीफार

वऱ्हाड-हिंगोलीकडे गेली. काही मेली. बाकीची मरायला टेकली आहेत. खडीच्या कामाने सगळे गाव जायबंदी, आडातले पाणी आटलेले.

गावच्या ओटचावर जाऊन बसलो. पंचायतीची सतरंजी आली. साहेबराव कीराजिइंनी चहा आणला. सगळे गाव जमा झाले. सभेची वेळ दिली होती रात्री आठची. पण माणसे बेचैन झालेली सव्वासातलाच सुरुवात केली. रोहिदास प्रथम बोलला. म्हणाला, या अठ्ठावीस गावातील १५२१ जनावरे गेल्या महिन्याभरात मेली. पाहवत नाही. मी उठलो. काय बोलणार? तरी बोललो तासभर. सभा चालू असतानाच चुंबची मुले आली. सभा संपल्यावर आमचा एकेकाच्या घरी जेवायची सोय केलेला. नेहमी खरपूस भाजलेली भाकरी मिळायची. पण यावेळी रेशनिंगच्या गव्हाची रोटी. परत पारावर येऊन सुपारी तोंडात टाकली. पानाला चुना लावत असताना चुंबच्या पुंडेंनी विचारले, 'विद्यार्थ्यांची काय सोय केली सरकारने?'

कॉलेजातील व एस. एस्. सी च्या विद्यार्थ्यांची फी माफ केली आहे.

'पण जेवायचे काय?'

'त्यावर खर्च केला तर केंद्र सरकार मंजूर करीत नाही असे मुख्यमंत्री सांगतात.'

'अकरावीतली तीन आणि दहावीतली दोन घरी बसली आहेत. एकजण तर डी. एड्. ला आहे. तोही घरी बसला. खडीचे काम त्याला होत नाही. त्याला मुकादम म्हणून तरी लावा.'

'तुम्ही काही व्यवस्था करा ना,' तिसऱ्याने सूचना केली. प्रा. अ. भि. शहा व त्यांच्या मित्रांनी काही मदत पाठवली. त्यातून चुंबच्या तीन विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षेपर्यंत सोय केली होती. पण आणखी कितीजणांची करणार? 'प्रयत्न करतो' तरी कसे म्हणावे? उगीच आशा लावून ठेवायची? पहातो म्हणालो, आणि तोंड फिरवले.

'स्वस्त धान्य दुकान आणि आडाचे तेवढे बघा." साहेबरावाने आठवण करून दिली. सगळ्यांशी थोडे थोडे बोलून निघालो. कंदील घेतला. झपाझपा पावले टाकीत कोरेगाव गाठले. डोंगराच्या कुशीत निश्चित पडले होते. महादेव पाटलांनी पोराला उठवले. चांगली खोली तेवढीच. तेथे सतरंज्या टाकल्या. उशाशी जाते, पायाशी चूल पाणी पिऊन अंग टाकले.

'बऱ्याच दिसांनी सहासात तास झोप मिळालीय. झोपू द्या भाऊना.' रोहिदासाचा आवाज ऐकून उठलो. साडेपाच वाजले होते. पावणेसातला बस होती. तोंडबिड धुतले. ज्ञानबा ढाकणे, नशीरमास्तर आले. पंढरी सावकार खडी कामावर दगड लागल्याने जायबंदी होऊन बार्शीच्या इस्पितळात पडले होते. त्यांच्या घरच्यांनी भाकरी बांधून दिल्या पोहोचत्या करायला. कोरेगाव तळयाचा गाळ काढायचे काम हाती घ्यायला लावा. आड आटलाय बोअरिंग केले पाहिजे. धान्य फार कमी

मिळते...

महादेव पाटलांनी बाजूला घेऊन सांगितले, ' गावचा पाटील परत खोड्या कराया लागलाय. माझा एक मुलगा मिलीट्रीत आहे. त्याला परस्पर पत्र पाठवून बोलावून घेतले. घरी येऊ देत नाही. कलेक्टरकडे अर्ज करायला 'बाप वाटणी देत नाही.' पोलीस चौकशीला येऊन गेले. मी जबाब दिला. पर पोलिसांचे मात्र काय काम ? हा तर दिवाणी मामला ' गावगुंडीला त्याचे काय सोयर सुतक..

तीन ठिकाणी चहा घेतला. बस निघाली. पलिकडे शेतात एक बैल मान टाकून बसला होता. मी बस थांबवून फोटो घ्यायला गेलो. चाहूल लागल्याने बैलाने मान उचावली. माझ्याकडे आशेने बघू लागला मी चटदिशी फोटो काढून परतलो.

घरी आल्यावर कळले की एका नातेवाईकाकडे आज सोयरीकीचा समारंभ आहे. बरेच पाहुणे आलेत. दुपारी चिखडर्याला जायला जरा उशिरा निघायचे ठरवले. १५-१६ पत्रं उरकली. परांड्याहून नानासाहेबाचा फोन आला. कामे संपली आहेत. मी पुण्याला दुपारी जेवायला गेलो. मोठी पंगत, तो थाट...कुणाशी न बोलता परत फिरलो. घरी बाईंना भाकरी करायला सांगितल्या. वीणाही दवाखान्याचे उरकून आलीच. जेवण आटोपून स्टँडवर निघालो. आरती व अजीतला सुट्टी असल्याने तेही दुष्काळ 'बघायला' निघाले. सोबत कल्लाप्पा होते रोहिदासची बस सुटेपर्यंत वाट पाहिली. कालच्या चालण्याने थकला होता. झोपला असणार. अखेर बस निघाली. बसमध्ये त्याच हकीकती सांगितल्या जात होत्या. एकाची अडचण मात्र वेगळ्या प्रकारची होती. विहिरीत पाणी असल्याने त्याच्या ज्वारीला दाणे भरत होते. पण पाखरांचा त्रास वाढला


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) पो. कतरी सराय (गया)**

होता. दरवर्षी पाखरे वाटून जायची. यावर्षी सगळ्यांची झुंबड एकावरच. राखुळीने जीव वैतागून गेला बघा.'

चिखडर्याला पाटलांकडे मुलांना सोडले. वाटेतच एकाने निवेदन दिले. होते. आड आटलाय. बोअरिंग करावे. पाझर तलाव होण्यासारखा आहे. तांदुळवाडीच्या जवळ निळकंठा नदीत झिंग डोह आहे. तेथे पाणी भरपूर आहे. तेथे जनावरांची छावणी सुरू करावी. पलिकडे एक शेतकरी एका कॉंग्रेस कार्यकर्त्यावर ताव काढीत होता 'निवडणुकीच्या वेळी घाई करतात चला पाच वाजले, चला पाच वाजले. अन् आता ? माणसं अन् जनावर दोन्ही मराया लागल्याती काय करतात तुमचे आमदार

विठ्ठलरावांच्या घराकडे जाताना वाटेत किसनराव दुकानदाराकडे खिन-भर टेकलो. एक मुलगा आला, पंचावन्न पैसे दिले आणि अर्धा किलो हुलगे द्या म्हणाला. किसनराव माप करून देत देत म्हणाले, 'याच्या घरात नऊ माणसे आहेत. त्या सगळ्यांसाठी हे हुलगे. हुलग्याची आंबील करतील, सगळेजण थोडी थोडी पितील आणि कशी तरी रात्र काढतील. काही जण तर दहा पैशाचा गूळ आणि पाच पैशाची पत्ती नेतात. भगुलेभर चहा उकळून पितात आणि पोट शांत करतात.

पाटलाकडून सायकल घेऊन तांदूळ-वाडीच्या खडी केंद्रावर निघालो. पुढल्या मडगार्डचा खिळा निसटल्याने ते चाकाला घासत होते. सायकल जड जात होती. गुडघे कडकडत होते पण अंधार पडायच्या आत फोटो घ्यायचे म्हणून मी सायकल दामटीत होतो. बऱ्याच गाड्या रिकाम्या परतत होत्या. सकाळी नदीत पाणी पाजून वर नेले की खडी वाहायला सुरुवात होते. दुपारी पाणीच मिळत नाही. म्हणून तीन चार वाजता बैल ओढ करू लागतात. ती खंगलेली बैलं. पाव ब्रास खडी वाहून नेताना त्यांचा जीव कासावीस होत होता दिवसाला गाडी व गाडीवानाला मिळून बारा रुपये. एक गडी जादा लागतो. त्याचे आणखी अडीच रुपये ठरले आहेत. पण अद्याप मिळत नाहीत.

'बैलांना दिवसभरात एक पाचुंदा पुरतो का ?'

'तसं कसं ? मेहनतीचं काम हाय. एकेकातला एकेक पाचुंदा अन् थोडीशी पेंड द्यावी लागते.'

'कडब्याचा भाव काय ?'

'हाय ऐंशी न्हाई तर नव्वद.

'म्हणजे बैल जोडीला दिवसाकाठी दहा रुपये खर्च.' हे खडी केंद्र गेले पाच महिने चालू आहे. पण निवारात नाही. आयडीनची शिशी मधून मधून देतात.

प्रश्नोत्तरे आटोपून तांदूळवाडी गावात गेलो. विठ्ठलराव झिंगे वाटच पहात होते. मजुरी आपल्याकडे बरी पडते म्हणाले. नदीमुळे पाण्याचेही ठीक आहे. पण धान्याचा तुटवडा. सामूहिक विहीर योजना, दहा रुपये धान्यापेक्षा कमी जमीनवाल्यांना विहीर खोल करण्यासाठी दोन हजाराची सबसिडी योजना रेडिओवर खूप ऐकल्या...परवा तुमचेही नाव आले होते...पण प्रत्यक्ष

मिळणार केव्हा ? जनावरांची छावणी या आणि खालच्या, दोन्ही शेतात होऊ शकेल. आग्रह धराच.

चहा पिऊन परत चिखर्डे. रोहिदास नंतरच्या तुळजापूर बसने निघून वळे-गावाला उतरून पायी आले होते. ग्राम-पंचायत ऑफीसमध्ये वसंतराव, बाळा-साहेब, बरेचजण जमले होते. रेडिओ सुरू होता. मी गेल्यावर सरपंचांना बोलावले. बी. कॉम्. झालेला हा तरुण गाव सुधारायच्या जिद्दीने गावात राहून शेती बघतो आहे. गावकऱ्यांनीही त्याला सरपंच निवडले. दुष्काळात लोकांना मदत मिळावी म्हणून धडपड चाललेली. पण लालफितीच्या गुंत्यामुळे गडी हैराण झाला होता. 'ग्रामसेवक कधी गावी येतच नाही ... (त्याच्या मागण्यांसाठी नागपूरला त्यांनी उपोषण केले. पंचे-चाळीसजणांना मृणालताईंच्या हस्ते हार घातले होते. ग्रामविकास मंत्र्यांनी शेवटी त्यांना समाधानकारक आश्वा-सन दिले होते.) मी तर त्यांना म्हटले, सगळे लिखाण आम्ही करतो. बार्शीला येऊन तुमच्या सह्याही घेतो. तुम्ही वेळेवर तुमचा पगार घेत जावा म्हणजे झाले. ... खडी केंद्र सुरू करण्यासाठी एक शेतकऱ्याची जमीन निवडली. त्याने संमती लिहून दिली. पण पुढची हाल-चाल होईना. हातोडी नाहीत, सुतक्या नाहीत. गावकऱ्यांना पहारी देण्याचे आव्हान केले. त्यांनी कबूल केले. पाझर तलावासाठी सोलापूरला गेलो होतो. कचेरी शोधण्यातच दिवस गेला. जिल्हा परिषदेत विचारले तर त्यांनी सांगितले स्टेशनजवळ. तेथे गेल्यावर त्यांनी आम्हाला वेड्यात काढले. अहो ते हपीस वडवान हॉटेलजवळ, म्हणजे जि. प. पासून अर्ध्या फर्लांगावर आहे. कसे करावे बघा...'

दवंडी दिल्यावरोबर चौकातही गर्दी जमली. सभा सुरू झाली. रोहिदास सांगत होता, येताना वाटेत बाबू-नानांच्या ओट्यावर टेकलो. म्हैस आरडत होती. मी विचारले, 'का आरडतीय ?'

डोळ्यात पाणी आणून बाबूनाना म्हणाले, गेला महिनाभर असच चाल-लय. दोन जनावरे गेली. काडकूड टाकून जगवतोय झालं. पर काई खरं न्हाई.

कोणी आंब्यांचा पाला ओरवडतोय तर कुणी लिंबाचा. पण त्यानं जनाव-रांना अपाय होतोय....

मी भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी विचारले, गावात किती जणांना कामाची गरज आहे ?

हजार बाराशे. नाही पंधराशे. गावची लोकसंख्या आहे सत्तावीसशे. पंधराशांना काम पाहिजेच.

खडीच्या कामावर कितीजण जातात ?

अडीचशे – तीनशे.

बाकीच्यांना ?

महिन्यापूर्वी तळेगावला सडकेचे काम होते. ते चालले चारपाच दिवस. त्याच्या पगारी अजून झाला न्हाईत. अन् तेव्हा-पासून दुसरे काही काम नाही.

पाणी नाही ही खरी अडचण. आमचा गाव गेल्यावर्षीच दुष्काळी म्हणून

जाहीर झालाय. पण अद्याप बोअरिंग-मशीन येथे आली नाही. धान्यदुकान चालवण्यास सोसायटीला पैसा कमी पडतो. चलने भरून आठआठ दिवस झाले तरी धान्य मिळत नाही. भाड्याने नेलेल्या बैलगाडीचे भाडे अंगावर पडते. सरकारने धान्यदुकानांना उधारीने माल पुरवावा.

भाषणात मी तरी काय सांगणार ? पुढले सात आठ महिने जायचेत. कोरेगाव भागातली काही जनावरे परभणी-नांदेडकडे गेली. पण तुमची इथेच आहेत. सोलापूर जिल्हा सगळ्यात जास्त दुष्काळग्रस्त, पण आपल्याकडे एकही छावणी सरकारने सुरू केली नाही. पिण्याच्या पाण्याची अडचण आहे सातशे गावांना. पण बोअरिंग यंत्र आहे तालुक्याला एक. एके दिवशी एक गाव घेतले नाही तालुक्यातील. १२१ गावांचा नंबर लागणार केव्हा ? पांझर तलाव, गोरवळे तलावाचा कालवा, ही कामे जरूर व्हावीत. पण पंधरावांना रोजगार कसा मिळणार ? सोलापूर–औरंगाबाद रेल्वेचे काम निघाल्याशिवाय तरणोपाय नाही. ... बऱ्याच सूचना केल्या. कल्पना मांडल्या. पण हे सगळे करणार कोण ? सरकारला हालवायचे कसे ? मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी ? तहानभुकेने हैराण झालेला बार्शी तालुका नव्हे सगळा सोलापूर जिल्हा विचारतो आहे, कुणी ?... कुणी ?...



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

# सलामी योजना ग्राहकांसाठी

सलामी योजना ग्राहकांना आतापर्यंत एकूण दहा पुस्तकांपैकी सात पुस्तके देऊन झालेली आहेत. ज्या ग्राहकांनी पुस्तके अद्याप नेलेली नसतील किंवा ज्यांना पोस्टाने मिळालेली नसतील त्यांनी त्वरित संपर्क साधून आपल्या प्रती ताब्यात घ्याव्यात. महिनाभरात हा व्यवहार पूर्ण होईल. मागाहून कोणतीही तक्रार आली तर तिचा विचार करता येणार नाही. कारण त्यावेळी पुस्तके संपलेली असतील.

या योजनेपैकी उरलेल्या तीन पुस्तकांचा शेवटचा हप्ता जानेवारी ७३ मध्ये ग्राहकांना देण्यात येईल. समक्ष घेऊन जाणाऱ्यांनी जानेवारी २० पूर्वी कचेरीच्या वेळात पुस्तके नेण्याची व्यवस्था करावी. येताना संदर्भासाठी पावती आणावी. याच सुमारास थोडे पुढेमागे पोस्टाने पुस्तके पाठविण्याचे कामही हातावेगळे होईल. या सर्व पोस्टग्राहकांनी आपल्याकडे येणारी टपाल-पॅकिंग इत्यादी खर्चाप्रीत्यर्थची व्ही. पी. सोडवून घ्यावयाची आहे.

या शेवटच्या तीन पुस्तकांपैकी एका पुस्तकाबाबत थोडा बदल झालेला आहे. श्री. शरद गोखले यांचे 'प्रभात' हे पुस्तक योजनेप्रमाणे ग्राहकांना द्यावयाचे होते. परंतु अद्याप या पुस्तकाचे हस्तलिखित तयार नाही. त्यासाठी बराच काळ थांबावे लागण्याची शक्यता आहे. असे थांबून, सर्व योजना अपुरी ठेवण्याऐवजी 'प्रभात' एवढ्याच किंमतपृष्ठांचे 'राजहंस' प्रकाशनचे अरुण साधूलिखित 'फिडेल चे आणि क्रांती' हे नवे प्रकाशन ग्राहकांना देऊन या योजनेचा सर्व व्यवहार पूर्ण करावा असे ठरविले आहे. ग्राहकांनी या बदलाची कृपया नोंद घ्यावी.

## रुपया पुस्तक योजना

□ रुपया पुस्तक योजनेपैकीही निम्मीअधिक पुस्तके ग्राहकांना देऊन झालेली आहेत. उरलेली ३।४ पुस्तके डिसेंबर ७२ मध्ये देण्याचा मानस होता. परंतु वीजकपातीमुळे या पुस्तकांच्या छपाईची कामे आता रेंगाळलेली आहेत. त्यामुळे वीजकपात रद्द होईपर्यंत आता निश्चित अशा कालमर्यादेचे आश्वासन देता येत नाही. खुलासे प्रतिखुलासे यात निष्कारण पत्रव्यवहार व वेळ वाया जाऊ नये म्हणून मुद्दाम हाही मुद्दा येथेच स्पष्ट केलेला आहे. ग्राहकांचा गैरसमज होणार नाही अशी आशा आहे.

व्यवस्थापक, राजहंस प्रकाशन.

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०